। लातूर । वर्ष ३५ वे । अंक ८३ वा । सोमवार, दिनांक १५ जून २०२६ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)   कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## इराण युद्ध संपणार, १९ जून रोजी स्वाक्षरी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : अमेरिका आणि इराण रविवारी शस्त्रसंधी, म्हणजेच सीझफायर करारापर्यंत पोहोचले. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी सोशल मीडियावर लिहिले की, इराणसोबतचा करार आता पूर्ण झाला आहे. तर इराणने निवेदन जारी करून सांगितले की, अमेरिकेसोबत अनेक महिने चाललेल्या प्रदिर्घ व कठीण वाटाघाटीनंतर दोन्ही देशांनी एका सामंजस्य कराराला, म्हणजेच एमओयूला अंतिम रूप दिले आहे.**

ट्रम्प म्हणाले की, या करारानुसार होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडली जाईल. त्यांनी असेही सांगितले की, त्यांनी इराणी बंदरांवर लावलेली अमेरिकेची नौदल नाकेबंदी तात्काळ हटवण्यास मंजुरी दिली आहे. ट्रम्प यांनी त्यांच्या पोस्टमध्ये लिहिले, जगातील जहाजांनो, तुमची इंजिने चालू करा. तेल वाहू द्यावे.

पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी सांगितले की, दोन्ही देश १९ जून रोजी स्वित्झर्लंडची राजधानी जिनिव्हा येथे शांतता करारावर स्वाक्षरी करतील. असे झाले, तर तेहरान आणि वॉशिंग्टन यांच्यातील ४७ वर्षांतील ही सर्वात उच्चस्तरीय बैठक असेल. तथापि, दोन्ही देशांमधील कराराचा संपूर्ण दस्तऐवज अद्याप जारी करण्यात आलेला नाही.

**करारावर स्वाक्षरी करण्यापूर्वी इराणच्या तीन अटी**

इराण आणि अमेरिका यांच्यातील कराराचा संपूर्ण मजकूर अद्याप जाहीर करण्यात आला नाही. मात्र, इराणी प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, दोन्ही देशांमधील सामंजस्य करारात अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश आहे.

यामध्ये युद्ध आणि लष्करी कारवाया थांबवणे, होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा खुली करणे, अमेरिकेची नौदल नाकेबंदी उठवणे, इराणची गोठवलेली काही मालमत्ता (निधी) मुक्त करणे आणि अणुकार्यक्रम व निर्बंधांबाबत पुढील ६० दिवसांत वाटाघाटींसाठी एक आराखडा तयार करणे या गोष्टींचा समावेश आहे.




इराणचे उप-परराष्ट्र मंत्री काझेम घरीबाबादी यांनी स्पष्ट केले आहे की, सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर सुरू होणाऱ्या अमेरिका-इराण यांच्यातील ६० दिवसांच्या वाटाघाटी या, अमेरिका आधी तीन विशिष्ट आश्वासने पूर्ण करते की नाही, यावर अवलंबून असतील. घरीबाबादी यांच्या मते, अमेरिकेने तीन पावले उचलणे आवश्यक आहे: १. नौदल नाकेबंदी संपवणे; २. युद्ध आणि सर्व लष्करी कारवाया थांबवणे; आणि ३. इराणची गोठवलेली मालमत्ता मुक्त करणे.असा असणार आहे.

### तुकाराम मुंढेंच्या टीमचे नवे मिशन!

## स्तनांचा आकार वाढवणाऱ्या प्रोडक्टसची पोलखोल...

**मुंबई/प्रतिनिधी:** भेसयुक्त पदार्थ आणि औषधांविरोधात मोर्चा उघडणारे अन्न आणि औषध प्रशासनाचे (एफडीएचे) आयुक्त तुकाराम मुंढेंच्या नेतृत्वाखालील टीमने आता महिलांना चिंतेत टाकणारी माहिती समोर आणली आहे. बेकायदेशीर औषधांनंतर एफडीएने आपला मोर्चा ब्युटी प्रोडक्ट्सकडे वळवला आहे. अन्न आणि औषध प्रशासनाने आता राज्यव्यापी कारवाई सुरु करत बनावट, भेसळयुक्त आणि नकली ब्युटी प्रोडक्ट्सवर कारवाई सुरु केली आहे. साताऱ्यातील कराड येथे दिशाभूल करणाऱ्या सौंदर्यप्रसाधनांचा २९.४५ लाख रुपयांचा साठा एफडीएने जप्त केला आहे.

एफडीएने केलेल्या कारवाईमध्ये आर्थिक राजधानीच्या केंद्रस्थानी असलेल्या मुंबईतील क्रॉफर्ड मार्केट परिसरामध्येही ब्युटी प्रोडक्ट्ससंदर्भात कारवाई करण्यात आली आहे. भ्रामक दावे करणाऱ्या सौंदर्यप्रसाधनांचा १.२० लाख रुपयांचा साठा जप्त करण्यात आला असून ही बाजारपेठ महिला ग्राहकांच्या आवडत्या शॉपिंगच्या ठिकाणांपैकी एक असल्याने या ठिकाणी सौंदर्य वाढवण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या वस्तू या महिलांसाठी घातक असल्याचं समोर आलं आहे.

**कांदिवली पश्चिम येथेही छापा**

केवळ क्रॉफर्ड मार्केटच नाही तर कांदिवली पश्चिम येथील संस्थेवरही एफडीएने छापा घातला आहे. विनापरवाना सौंदर्यप्रसाधने विकण्याबरोबरच कच्चा माल आणि यंत्रसामग्रीसह ३.९६ लाख रुपयांचा मुद्देमाल एफडीएने जप्त केला आहे. राज्यभरातील कारवाईत एकूण ३४.६१ लाख रुपयांच्या सौंदर्यप्रसाधनांवर कारवाई करण्यात आली आहे. कराडमधील तपासणीदरम्यान एफडीएला ब्युटी प्रोडक्टससंदर्भातील अनेक उत्पादनांवर बॅच क्रमांक, उत्पादन दिनांक आणि उत्पादकाची माहिती अपुरी किंवा अनुपस्थित आढळून आली.

**सुडौल दिसण्यासाठीच्या सामन्यामध्येही फेरफार**

कराडमधील छापेमारीदरम्यान काही उत्पादनांवर परवाना क्रमांक नमूद असला तरी उत्पादकाची माहिती नसल्याने ती दिशाभूल करणारी असल्याचा प्राथमिक निष्कर्ष एफडीएने काढले आहे. मुंबईतील क्रॉफर्ड मार्केटमधील तपासणीत 'ब्रेस्ट एन्लार्ज' (स्तनांचा आकार वाढवण्याचा दावा करणारे प्रोडक्ट), 'बट एन्हान्समेंट' (पार्श्वभागाचा आकार सुडौल करण्याचा दावा करणारे प्रोडक्ट) आणि 'फॅट बर्नर'सारखे (चरबी कमी करण्याचा दावा करणारे प्रोडक्ट) भ्रामक दावे करणारी उत्पादने आढळली आहेत. शरीर अधिक सुडौल दिसावं या हेतूने हे प्रोडक्टस वापरले जातात. मात्र या प्रोडक्टसचा दर्जा आणि एकंदरित मान्यता याबद्दल आवश्यक पुर्तता न करता त्याची विक्री केली जात असल्यानेच कारवाई करण्यात आली आहे.

## चाकूर - लातूररोड बायपास ठरतोय अपघातांचा 'ब्लॅक स्पॉट', आठ दिवसात चौघांनी गमावला जीव

**लातूर/प्रतिनिधी:** चाकूर : राष्ट्रीय महामार्गाच्या चुकीच्या नियोजनामुळे लातूर-नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील चाकूर आणि लातूररोड बायपास, टी पॉईटवर दिवसेंदिवस अपघात वाढले असून त्या अपघातात आठ दिवसांत चार जणांना आपला जीव गमवावा लागल्याने ते ठिकाण अपघाताचा ब्लॅक स्पॉट ठरतोय.

राष्ट्रीय महामार्गावर चाकूर बायपास आणि लातूर रोड बायपास टी-पॉईटवर दिवसेंदिवस अपघाताचे सत्र सुरूच असून चाकूर बायपासवर शनिवारी पुन्हा एकदा तिहेरी भीषण अपघात झाला आहे. त्या अपघातात अहमदपूरहून लातूरकडे जाणारा आयशर ट्रक (क्रमांक एमपी ०९ जीएच १०२०) भरधाव वेगाने येत असताना चाकूरकडून (अलगरवाडी पाटी) बायपासजवळ रस्ता ओलांडत असलेल्या मोटारसायकल स्वराला जोरदार धडक दिली. या दुर्दैवी अपघातात मोटारसायकलवरील जनार्धन काळबा येणगे वय ६० वर्षे व त्यांच्या पत्नी सविता जनार्दन येणगे वय ५५ रा. तेलगाव हे पती-पत्नी जागीच ठार झाले. या धडकेनंतर आयशर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि विरुद्ध दिशेने समोरून लातूरहून शिरूर ताजबंदकडे जाणाऱ्या वॅगनर एम एच २४ बी आर ७१२१ कारवर जोरदार धडकले. वॅगनरमधील श्रेयश सचिन वाघमारे वय १६ वर्षे रा. शिरूर ताजबंद या तीन जणांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाल्याने या धोकादायक ठिकाणाच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आठ दिवसापूर्वी वडवळ जवळील शंकरनगर तांडा येथील माजी उपसरपंच पंडित नामदेव पवार वय ५७मोटारसायकलवरून गावाकडे जात असताना लातूर रोड बायपास टी पॉईंटजवळ त्यांच्या मोटार सायकलला उड्डाणपुलावरून येणाऱ्या भरधाव ऑटोने त्यांना जोरदार धडक दिली. त्या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यामध्ये त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. लातूरहून नांदेडकडे गेलेला राष्ट्रीय महामार्ग अतिशय भयावह ठरत आहे. या राष्ट्रीय महामार्गावर दीड ते दोन किलोमिटर अंतराच्या उड्डाणपुलाची निर्मिती केली आहे. ती अपेक्षित असलेली ठिकाणे सोडून दुसरीकडेच केल्यामुळे अपघातात वाढ झाली आहे. चाकूर आणि लातूर रोड बायपास, टी पॉईंटवर दुचाकीवरून जाणारे नागरिक रस्ता ओलांडून जाताना पूर्णपणे गोंधळून जातात. यामुळे तेथे अपघात होत आहेत.

चाकूर आणि लातूर रोडचा उड्डाणपूल जवळपास एक ते सव्वा किलोमीटरचा उभारण्यात आलेला आहे. चाकूरला बायपास अलगरवाडी पाटीजवळ उड्डाणपूल होणे गरजेचे आहे. परंतु तेथे उड्डाणपूल न झाल्यामुळे त्या बायपास टी पॉईंटवर राष्ट्रीय महामार्ग झाल्यापासून आतापर्यंत अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. तो रस्ता अतिशय धोकादायक ठरत आहे. तेथून रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरून जावे लागते. कारण नांदेडहून येणाऱ्या वाहनाचा वेग उतारामुळे भरधाव असतो. त्याच्या वेगाचा अंदाज येत नसल्यामुळे याठिकाणी मोठया प्रमाणात अपघात होत आहेत.

याठिकाणी राष्ट्रीय महामार्गान अपघात होऊ नये या दृष्टीने कुठलीच नियमावली नागरिकांच्या हितासाठी वापरली नसल्यामुळे या ठिकाणी वारंवार अपघात घडत आहेत. पुरेशा सुरक्षा उपाययोजनांचा अभाव, वेग नियंत्रणासाठी प्रभावी यंत्रणा नसणे आणि या रस्त्याकडे दुर्लक्ष झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. स्थानिकांनी चाकूर बायपास व लातूररोड टी पॉईंटवर उड्डाणपुलाची मागणी केली आहे. त्यावर ठोस कार्यवाही झाली पाहिजे. परिणामी या ठिकाणी अपघातांची मालिका सुरूच राहणार आहे. दरम्यान रविवारी सकाळी ८ च्या सुमारास त्या अपघात स्थळापासून काही अंतरावरच दोन चारचाकी वाहनांचा अपघात झाला असून त्या अपघातात दोघे जखमी झाले आहेत. तालुक्यातील नांदगाव नंतर चाकूर- लातूर रोड बायपास टी पॉईंट हा मोठा अपघाताचा ब्लॅक स्पॉट म्हणून दिवसेंदिवस ओळखला जात आहे. भविष्यात याठिकाणचे अपघात टाळण्यासाठी राष्ट्रीय महामार्गाने उपाययोजना कराव्यात अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### हेल्मेट वापरासाठी पोलिसांकडून जागृती

लातूर : दुचाकी चालकांनी हेल्मेटचा वापर वाढवावा, यासाठी लातूर जिल्हा पोलिस दलाकडून विविध उपक्रम राबविले जात आहेत. रक्तदान शिबिरात रक्तदात्यांना हेल्मेट भेट दिले जात आहे. अपघातात केवळ सुरक्षेचा अभाव असल्यामुळे अनेकदा दुचाकी चालकांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे वाहनधारकांनी हेल्मेटचा वापर वाढवावा, असे आवाहन जिल्हा पोलिस दलाकडून करण्यात आले आहे.

### प्रभात किरणे

माणसा माणसा तुला र मिळत
प्राणवायू हवा पाणी सार फुकट
तुला नसते कळत त्याची किंमत
मिळत नसे समाधान सुख विकत

-इंजि. नागनाथ कलवले
लातूर ९७६४७ ८८२८८


### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



राज्यात मान्सूनची
वाटचाल
संथ गतीने......

### चिमटा दयाचा



सिंगलयुज प्लास्टिक
विरोधात मनपाची कारवाई
जोरात चालू आहे!
दंड वसुलीचे पावतीबुक
सतत हाती दिसत आहे!!

## लातूर जिल्ह्यात जुगार व मटका अड्डयांवर धाडी

### १८ आरोपींविरुद्ध कारवाई, ४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यात काही ठिकाणी मटका - जुगार सुरू असल्याची खात्रीशीर माहितीमिळाल्यावरून, पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी नांदेड येथून कारवाईसाठी पोलीसपथक पाठविले होते.

सदर पथकाने, दिनांक १३/०६/२०२६ रोजी, औसा शहरातील कालन गल्लीतील अबुझर शेख याचेदुकानामध्ये चालू असलेल्या मटका बुकीवर कारवाई करत ४३,१६०/- रुपयांची रोकड, ४९ हजार रुपयांचे(०५) मोबाईल व ७०,८००/- रुपयांचे संगणक साहित्य, असा एकूण १,६२,९६०/- रुपयांचा मुद्देमाल जप्तकेला असून, नमूद प्रकरणात एकूण (९) आरोपीतांना ताब्यात घेवून, त्यांचेविरुध्द औसा पोलीस ठाणे येथेगुरनं ३२५/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



तद्नंतर, मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, कासार शिरशी येथे सचिन बार च्या बाजूला प्रभाकर माने यांच्या दुकानात छापा टाकला असता, सदर ठिकाणी तिर्रट नावाचा जुगार खेळताना (९) इसम मिळून आले. सदर इसमांना ताब्यात घेऊन, त्यांच्याकडून ३२,९१०/- रुपयांची रोकड, ६५,८००/- रुपयांचे (९) मोबाईल, व १,४५,०००/- रुपयांच्या (४) मोटारसायकली, असा एकूण २,४३,७१०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्यांचेविरुध्द कासार शिरशी पोलीस ठाणे येथे गुरनं १३७/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्याअन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

उपरोक्त दोन्हीही कारवायांत, पोलीस पथकाने एकूण ४,०६,६७०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, (१८) आरोपीतांविरुद्ध वरीलप्रमाणे गुन्हे नोंद केले आहेत. सदर कारवाईत, पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/संजीव जिंकलवाड, पोकॉ/ गणेश धुमाळ व पोकॉ/ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## लातूर ग्रामीण मधून बसवराज पाटील यांना मोठे मताधिक्य देऊ - आ.कराड

**लातूर/प्रतिनिधी:** उस्मानाबाद लातूर बीड स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधान परिषद निवडणुकीत भाजपा महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील मुरूमकर यांना लातूर ग्रामीण मतदार संघातून अपेक्षेपेक्षा अधिक मताधिक्य देऊ अशी ग्वाही भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

भाजपा महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या लातूर येथील प्रयाग या निवासस्थानी रविवारी सकाळी सदिच्छा भेट देऊन लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील मतदारांशी संवाद साधला यावेळी औसा मतदार संघाचे आ. अभिमन्यू पवार यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. प्रारंभी आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने भाजपा महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील आणि आ. अभिमन्यू पवार यांचा यथोचित सत्कार करून स्वागत केले.

उस्मानाबाद लातूर बीड स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधान परिषद निवडणुकीकरिता असलेल्या मतदारातून भाजपा आणि मित्रपक्षाशिवाय इतरही मतदारांना सोबत घेऊन भाजपा महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांना लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून



मोठे मताधिक्य मिळवून देऊ अशी ग्वाही यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली तर आ. अभिमन्यू पवार यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी बसवराज पाटील यांचा विजय महत्त्वाचा असल्याचे बोलून दाखविले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि भाजपा पक्ष नेतृत्वाने माझ्यावर टाकलेला विश्वास निश्चितपणे सार्थ ठरवू मतदारांनी मतदानरुपी आशीर्वाद देऊन काम करण्याची संधी द्यावी असे याप्रसंगी बसवराज पाटील यांनी बोलून दाखविले. यावेळी उपस्थित असलेल्या प्रत्येक मतदारांशी संवाद साधला.

या बैठकीस भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्या गोडभरले, जिप सदस्य महादेव साळुंके, सौ. छायाबाई चिंचोलकर, रेणापूर पंचायत समितीच्या सभापती सौ. मोनिका सुर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक अकनगिरे, उपनगराध्यक्ष खैरुनिसा आत्तार, नगरसेवक दत्ता सरवदे, सौ. ज्योती चव्हाण, सौ. सुनीता बसतापुरे, सौ. धरती गाडे, सौ. राबिया शेख, प्रदीप राठोड, वाहेद शेख, सौ. हुसेना शेख, रमाकांत वाघमारे, भाजपाचे पद्माकर चिंचोलकर, महेंद्र गोडभरले, रवी सुर्यवंशी, अॅड. दशरथ सरवदे, विजय चव्हाण, अजिम शेख, महेश गाडे यांच्यासह मतदार भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी उपस्थित होते.

## 'शिक्कामोर्तब' नाटकाच्या माध्यमातून लोकप्रिय अभिनेते 'कांचन पगारे' मजनू या 'बंगाली' भूमिकेतून उडवणार हास्याचे फवारे!



**मुंबई /मोईज सितारी:** हिंदी आणि मराठी मनोरंजन विश्वात, तसेच छोट्या पडद्यापासून ते मोठ्या पडद्यापर्यंत आपल्या सहजसुंदर अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण करणारे अष्टपैलू अभिनेते कांचन पगारे आता एका नव्या दमाने रंगभूमीवर परतले आहेत. 'तरंगिणी एंटरटेनमेंट' आणि 'नवनीत' निर्मित, तसेच प्रमोद शेलार लिखित व दिग्दर्शित 'शिक्कामोर्तब' या नव्याकोऱ्या नाटकातून ते रसिक प्रेक्षकांना आपल्या प्रतिभेची एक वेगळीच जादू दाखवण्यासाठी सज्ज झाले आहेत. नाटक ही कलाकाराच्या अभिनय क्षमतेची खरी कसोटी मानली जाते. प्रसिद्धीपेक्षा कलेवरील निष्ठा आणि अभिनयातील प्रामाणिकपणा जपत, रंगभूमीशी पुन्हा घट्ट नाते जोडण्याचा कांचन पगारे यांचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. 'शिक्कामोर्तब' या नाटकात त्यांनी एका मजनू ह्या 'बंगाली' माणसाची अत्यंत अफलातून आणि आव्हानात्मक भूमिका लीलया साकारली आहे. बंगाली धाटणीच्या मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी आणि त्या भूमिकेची योग्य पकड घेण्यासाठी त्यांनी घेतलेली अपार मेहनत नाटकाच्या सादरीकरणात स्पष्टपणे दिसून येते. मजनू या पात्रात स्वतःला पूर्णपणे झोकून देऊन ते जिवंत करण्याची त्यांची शैली वाखाणण्याजोगी आहे. विनोदी प्रसंग असोत किंवा भावूक क्षण, त्यांच्या अभिनयातील नैसर्गिकपणा प्रेक्षकांना भारावून टाकतो. या नाटकात कांचन पगारे यांच्यासह सागर कारंडे, स्नेहा पराडकर आणि भक्ती रत्नपारखी या दिग्गज कलाकारांची दमदार फळी आहे. विशेषतः रंगमंचावर सागर कारंडे आणि कांचन पगारे यांची अभिनयातील 'केमिस्ट्री' आणि जुगलबंदी संपूर्ण नाटकात भाव खाऊन जाते. त्यांना स्नेहा पराडकर यांच्या करारी 'वकिली'ची आणि भक्ती रत्नपारखी यांच्या 'लैला' या पात्राची उत्तम साथ लाभली आहे.

एका जोडप्याच्या आयुष्यात अचानक आलेल्या दुसऱ्या जोडप्यामुळे निर्माण होणारा गोंधळ आणि त्यातून नात्यांवर अधिकृतरीत्या 'शिक्कामोर्तब' करणे किती गरजेचे असते, हा विषय अत्यंत खुमासदार विनोदी शैलीत मांडून प्रेक्षकांना विचार करण्यास भाग पाडण्यात दिग्दर्शक यशस्वी ठरले आहेत. कांचन पगारे आणि इतर कलाकारांच्या दमदार अभिनयाला तांत्रिक बाजूची उत्तम जोड मिळाली आहे. नेपथ्यकार संदेश बेंद्रे यांनी उभारलेले आलिशान घर, शीतल तळपदे यांची मोहवून टाकणारी प्रकाशयोजना आणि अभिजित पेंढारकर यांच्या सुमधुर संगीतामुळे नाटकाची रंगत अधिकच खुलते. नाटकाचे निर्मिती प्रमुख म्हणून महेंद्र खराडे उत्तम जबाबदारी सांभाळत आहेत. अभिनयाचा हा निखळ आनंद अनुभवण्यासाठी आणि कांचन पगारे यांच्या या नव्या व प्रेरणादायी नाट्यप्रवासाचे साक्षीदार होण्यासाठी रसिक नक्कीच आतुर असतील. या नवीन नाट्यकृतीसाठी कांचन पगारे आणि त्यांच्या संपूर्ण टीमला मनापासून शुभेच्छा. ही कलाकृती नक्कीच यशाची शिखरे गाठेल आणि रसिक प्रेक्षक आपल्या प्रेमाचा 'शिक्का' या नाटकावर नक्कीच उमटवतील, अशी नटेश्वर चरणी प्रार्थना!

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## संवेदनाहीन व्यक्ती बनत आहे

जगा बरोबर देशात सर्वकाही निर्मिती करता येते मात्र राष्ट्रप्रेम निर्माण करावे लागते. एकतर राष्ट्रप्रेम भारतीयांत लोप पावत आहे. त्यापेक्षाही वाईट बाब म्हणजे संवेदनाहीन व्यक्ती-समाज बनत आहे. यात हिंदु समाज हा अग्रगण्य गणला जात आहे. चेतनाहीन व्यक्ती बनत आहेत. पुर्वी राष्ट्रसाठी पेटून उठत होते. राष्ट्रीय संपत्तीची कोणी उधळण करीत असेल तर त्याला रोखले जात होते. आता आपल्याला काय करायाचे असे म्हणून आपण जणू परपदेशातच राहातो की, असे समजत आहे. कोणतीही बाब घ्या भारतीय व्यक्ती आपल्याला काय करायाचे? असे म्हणत आहे. ज्यावेळी बंदुकीच्या नोकावर परिवर्तन घडवतील त्यावेळी मात्र सर्वांचे डोळे उघडल्याशिवाय राहात नाही. शेजाराच्या घराला आग लागली, आपल्याला काय करायाचे? तुझे घराला जेंव्हा आग लागेल त्यावेळी कोण धावुन येणार? मुळात भारतात आता काही आग लावणारे आहेत. समाज एकसंघ नसेल तर नुकसान आहे. मुळात भारतीय नागरिकांनी एकसंघ झाले पाहिजे. आलेल्या संकटाला तोंड दिले पाहिजे. अनेक संकटे येतात, आपल्याला काय करायाचे ही भाषा वापरणे योग्य नाही. ज्यावेळी भारतात राहातो त्या देशाची सुरक्षिता जपली पाहिजे. राष्ट्रीय मालमत्तेचे नुकसान कोण करीत असेल तर रोखले पाहिजे. कोणी घुसखोरी करीत असेल तर त्याला रोखण्याची हिंमत समाजात असली पाहिजे. भारतीयांचे रक्त वरचेवर थंड होत आहे. संवेदना उरली नाही. पेटून उठण्याची क्षमता संपत चालली आहे. काय देशात चालले आहे यावर चिंतन नाही. सतत मोबाइलच वापर, टिव्ही पहाण्याचा छंद असून माहिती जाणून घेतली असताना देखिल आपल्याला काय करायाचे हे विचार कोठे तरी बंद केले पाहिजेत. असेच विचार राहीले तर एक ना एक दिवस पारतंत्र्यात जावे लागेल. एक ना एकदिवस पुन्हा गुलाम व्हावे लागेल. आपण आपल्या मुलाबाळाचे, मुलींचे संरक्षण करू शकणार नाहीत तर त्या जगण्याला काय अर्थ? आपण म्हणतो छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रताप आदि शुरविरांचे वंशज आहोत. ते काय पुळचट होते का? आपण राम, कृष्णाचे वंशज समजतो ते शुर, वीर, अन्यायावर मात करणारे धाडसी होतो. असा आपला गौरवशाली इतिहास असताना आलिकडील पिढी संवेदनाहीन बनत आहे. लढण्याची हिंमत अंगी दिसून येत नाही. यात सुधारणा झाली नाही, परिवर्तन झाले नाही तर संकट अटळ आहे. साधा गल्लीतील रेशन दुकान चुकीचे काही करत असेल किंवा दारू मुळे गल्लीत त्रास होत असेल तर जनता गप्प राहाते. आपल्याला काय करायाचे असे सर्रास मत व्यक्त करीत आहे. हे अतिषय वाईट बाब आहे. जो व्यक्ती चुकीचे करतो त्याच्या विरोधकरणे हे लोकशाहीत प्रत्येकाचे कर्तव्य आहे. देश म्हणजे देशातील जागृत जनता आहे. देश म्हणजे देशातील धाडसी, निरोगी व बलशाली जनता आहे. मुर्रदांड जनता काही कामाची नाही. दगड धोंडे म्हणजे देश नाही. हे प्रत्येक भारतीयांनी लक्षात घेतले पाहिजे. देशात आलिकडील वातावरण समाधान कारक नाही. जे मोफत मिळते हे रुचकर, आरोग्य वर्धक आहे का? पौष्टीक आहे याचा तरी विचार करा. सर्व काही सरकारनेच करावे ही भावना सोडून दिली पाहिजे. देशाचे नागरिक म्हणून आपले कर्तव्य बजावले पाहिजे. देशात जे घडते यावर चिंतन देशातील जनता करणार का परदेशातील जनता करणार? याचा तरी विचार केला पाहिजे. जी मंडळी भारत हा सुरक्षित देश नाही असे म्हणणारी मंडळी अजून देश सोडून गेली नाही. भारतात राहुन नाव कमवयाचे, धन कमवायाचे पुन्हा जात्यांधांनी देश सुरक्षित नाही असे म्हणणाऱ्यास त्यांची जागा दाखविली पाहिजे. आलिकडे वाचाळ बोलणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे. नसता भारतात राहुन भारताविरोधात बोलणारे जे असतील त्यांना शेजाराच्या राष्ट्रात हाकलुन दिले पाहिजे. आपल्या भारताला शिव्या घातल्यातरी विरोध करणारी मंडळी भारतात राहतात हे मोठे आश्चर्य आहे. त्यामुळे भारतीयांनी विचार करून जे देशविरोधी वक्तव्य करतात त्यांना त्यांची जागा दाखवुन दिली पाहिजे. भारत हा विशाल देश आहे. येथे एकाच जाती,धर्म,मत व पंथाचे लोक नाहीत. विविधतेतून एकता साधणारी मंडळी आहे. अशा एकत्मतेमध्ये मिठाचा खडा टाकणारी मंडळी बोटावर मोजण्याइतकी आहे, त्या विखारींना ओळखुन चालण्याची गरज आहे. त्यासाठी संवेदना महत्त्वाच्या दिसून येतात. देशाला सहज, सोपे व अहिंसेने स्वराज्य मिळाले नाही तर दिडशे वर्ष संघर्ष करावा लागला आहे. अशा संघर्षमय क्रांतीतून स्वराज्य टिकविण्यासाठी भारतीयांत नवचैतन्याची मोठी गरज आहे. भारत आतून पोखरला जात आहे. विधातक शक्ती कार्यरत असल्याने त्याचा शोध घेणे अपेक्षित आहे. अशा वाईट प्रवृत्तीचा बंदोबस्त करण्यासाठी भारतीयांनी सतेज असले पाहिजे. जागृत बरोबर सवेदनशील असले पाहिजे. संवेदशील व्यक्तीमत्त्वाची गरज आहे. विचारशुन्य असणाऱ्यांची गरज नाही. यासाठी केंद्र सरकारने आता शिक्षणात बदल करण्याची गरज आहे. काही बाबी कालबाह्य झाल्या असतील तर त्या रद्द करून सुधारणा करण्याची गरज आहे. मुळात आपल्या देशात शिक्षण हे ब्रिटीशकालीन आहे. बदल झाला तो बदल कासवगतीने झाला व होत आहे. राष्ट्रीय, राष्ट्रप्रेम निर्माण करणारे शिक्षणाची मोठी गरज आहे. ते जर विद्यार्थ्यांनी अंगीकारले तर वाईट बाबी समाप्त होतील. भ्रष्टाचार आपोआप संपुष्ठात येईल. त्यामुळे विचार करून आता वाटचालीची गरज आहे. आपल्याला काय करायाचे हे विचार सोडून दिले पाहिजे. आपल्याला काय करायाचे असे विचार मनी येत असतील तर शेजाराच्या राष्ट्रात जावो. कोणी आडविणार नाही. एकदा वाईट वृत्तीच्या लोकांना हात दाखविण्याची गरज आहे. ज्यांना संवेदना नाहीत, नष्ट झाल्या असतील त्यांना तसे पाहिले तर जगण्याचा अर्थ समजला नाही. त्यामुळे संवेदनशील बना. राष्ट्रीय विचाराचे बना. राष्ट्रप्रेमी बना! नसता पारतंत्र्याचे जीवन जगण्यात सज्ज व्हा!

# योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी - मंत्री जयकुमार रावल

## आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर महावाणिज्यदूत आणि मानद वाणिज्यदूतांसाठी विशेष योग सत्र

**मुंबई/प्रतिनिधी :** योग ही भारताने जगाला दिलेली सर्वात मौल्यवान देणगी आहे. योग केवळ शारीरिक व्यायाम नसून शरीर, मन आणि आत्मा यांच्यात सुसंवाद निर्माण करणारी जीवनपद्धती असल्याचे प्रतिपादन पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी केले. आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ च्या पार्श्वभूमीवर सर्व देशांच्या महावाणिज्यदूत व मानद वाणिज्यदूतांसाठी आयोजित केलेल्या विशेष योग सत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



राजशिष्टाचार विभाग आणि कैवल्यधाम योग संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मरीन ड्राईव्ह येथील संस्थेच्या सभागृहात शनिवारी सकाळी हे विशेष सत्र उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. मंत्री श्री रावल यांच्या हस्ते योग सत्राचे उद्घाटन झाले.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक शंखनादाने करण्यात आली. त्यानंतर कैवल्यधाम संस्थेचे विश्वस्त निवित श्रीवास्तव यांनी मंत्री जयकुमार रावल यांचे स्वागत केले. कैवल्यधाम या भारतातील सर्वात जुन्या योग संशोधन व शिक्षण संस्थेचे संस्थापक स्वामी कुवलयानंद यांच्या प्रतिमेस मंत्री श्री रावल आणि मान्यवरांनी पुष अर्पण केले.

यावेळी मंत्री श्री रावल म्हणाले, आंतरराष्ट्रीय योग दिनाला संयुक्त राष्ट्रसंघाने दिलेली जागतिक मान्यता ही भारतासाठी अभिमानाची बाब आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे योगाला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले. विविध देश, संस्कृती आणि परंपरांतून आलेल्या समाजास आरोग्य, शांतता आणि आनंद या समान मूल्यांनी जोडण्याचे सामर्थ्य योगामध्ये आहे. योगाच्या शास्त्रीय परंपरेचे जतन आणि प्रसार करण्यासाठी कैवल्यधाम संस्थेने केलेल्या शतकोत्तर कार्याचे कौतुक त्यांनी यावेळी केले.

यावेळी कैवल्यधाम योग संस्थेच्या तज्ज्ञ प्रशिक्षकांनी उपस्थितांना विविध योगासने आणि प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर करून त्यांचे आरोग्यविषयक लाभ समजावून सांगितले. योग सत्रात युगांडा, अर्जेंटिना, न्यूझीलंड, बांगलादेश, ब्रिटन, घाना, जपान, युक्रेन, फ्रान्स, झेक प्रजासत्ताक, सिंगापूर, इजिप्त, नॉर्वे, ब्राझील, मॉरिशस, थायलंड, तुर्की, कॅनडा, आयर्लंड, येमेन, बेलारूस, मेक्सिको, श्रीलंका, दक्षिण कोरिया, पेरू आणि ग्रीस आदी २६ देशांचे महावाणिज्यदूत, वाणिज्यदूत, उच्चायुक्त तसेच त्यांचे प्रतिनिधी सहभागी झाले.

आंतरराष्ट्रीय योग दिन दरवर्षी २१ जून रोजी जगभर साजरा केला जातो. या उपक्रमामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिनिधींना भारतीय संस्कृती आणि योग परंपरेचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळाली. उपस्थित मान्यवरांनीही या उपक्रमाचे कौतुक करून योगाच्या जागतिक प्रसारासाठी अशा कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

# ओरडणारे मूल कोणाचेही ऐकत नाही: हट्टी मुलाचे मन मोबाईलप्रमाणे 'फ्लाइट मोड'मध्ये जाते

तुम्ही कधी विचार केला आहे का की, जेव्हा तुमचे पाच वर्षांचे मूल झोपण्याच्या वेळी पॉप्सिकल (आईस कँडी) खाण्याचा हट्ट धरते आणि न मिळाल्यास रडत ओरडते की 'मी तुमच्यावर प्रेम करत नाही', तेव्हा पालक म्हणून तुमची पहिली प्रतिक्रिया काय असेल?

सामान्यतः लोक रागावतात, ओरडतात किंवा विषय दाबण्याचा प्रयत्न करतात. पण हाच तो क्षण आहे, जिथे तुमची 'जिज्ञासा' एका उत्तम पालक म्हणून तुमची परीक्षा घेते. खरं तर, जेव्हा मूल ओरडते, तेव्हा त्याची मज्जासंस्था (नर्वस सिस्टम) खूप तणावात मोबाईलच्या फ्लाइट मोडसारखी नेटवर्कबाहेर जाते. तेव्हा त्याला तुमचे काहीही ऐकू येत नाही, ना समजतं. अशा परिस्थितीत त्याच्यावर रागावण्याऐवजी किंवा शिस्त शिकवण्याऐवजी तुमचे शांतपणे जवळ बसणे, तुमची जिज्ञासा आणि तुमचा संयमच सर्वात जास्त उपयोगी पडतो.

पालकत्व तज्ज्ञ आणि 'ए शार्प एंडलेस नीड' च्या लेखिका मॅक क्रेन सांगतात की, पालकत्व हे खरं तर मुलांवर नियंत्रण ठेवण्याचं किंवा ताकद दाखवण्याचं साधन नाही, तर तो दररोज स्वतःला आणि मुलांना अधिक सखोलपणे समजून घेण्याची एक अंतहीन शोध आहे. प्रसिद्ध ऑस्ट्रियन कवी रेनर मारिया रिल्के यांच्या ओळींचा संदर्भ देत क्रेन सांगतात की, मुलांचं संगोपन आपल्याला 'प्रश्नांसोबत जगायला' शिकवतं. जेव्हा एखादं मूल एखाद्या गोष्टीवर चिडतं, तेव्हा आपण गुप्तहेरासारखं त्याच्यामागे लपलेली कारणं शोधली पाहिजेत. उदाहरणार्थ- त्याचा शाळेत दिवस वाईट गेला होता का?

खरं तर, जेव्हा मुलांच्या वर्तनाकडे शिस्तीच्या दृष्टिकोनातून पाहण्याऐवजी त्यांच्या मनातील घालमेल समजून घेण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा मुलांमध्ये करुणा, प्रतिष्ठा आणि सुरक्षिततेची भावना विकसित होते. एखाद्या मुलाला दिली जाणारी सर्वात मोठी भेट हीच आहे की त्याला आणि त्याच्या भावनांना नेहमी गांभीर्याने घेतले जावे.

**स्वतःशी प्रामाणिक राहूनच उत्तम पालक बनणे शक्य**

मानसशास्त्रज्ञांच्या मते, जे पालक स्वतःबद्दल उत्सुक नसतात, ते मुलांसाठी चांगले आदर्श (रोल मॉडेल) बनू शकत नाहीत. जर तुम्ही तुमच्या उणिवा, तुमच्या भावना आणि तुमच्या बदलत्या विचारांबद्दल सहज नसाल, तर तुम्ही मुलांच्या भीतीला किंवा त्यांच्या आनंदाला योग्य प्रकारे हाताळू शकणार नाही. पालकत्वाचे अंतिम ध्येय मुलांना आत्मनिर्भर बनवणे हे आहे, परंतु या प्रवासात कुतूहल हा एक असा पूल आहे जो पालक आणि मुलांच्या नात्याला वयाच्या प्रत्येक टप्प्यावर मजबूत आणि आदरयुक्त ठेवतो.

# महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि उत्तरदायी व्हावे - अपर मुख्य सचिव विकास खारगे

**मुंबई/प्रतिनिधी:** महसूल विभाग हा केवळ जमिनींच्या नोंदींचा विषय नसून नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण, आदिवासी व वंचित घटकांना न्याय, शासकीय जमिनींचे संवर्धन आणि विकासकामांना गती देणारी महत्त्वपूर्ण यंत्रणा आहे. नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ व्हावा, महसूल सेवा अधिक सुलभ व पारदर्शक व्हाव्यात आणि शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा, यासाठी महसूल विभागाने अधिक संवेदनशीलतेने आणि उत्तरदायित्वाने कार्य करावे, असे प्रतिपादन महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी केले.




जिल्हाधिकारी कार्यालयात शुक्रवारी आयोजित महसूल विभागाच्या आढावा बैठकीत त्यांनी महसूल अभिलेखांचे अद्ययावतीकरण, शासकीय जमिनींचे व्यवस्थापन, अतिक्रमण निर्मूलन, स्वामित्व योजना, आदिवासी जमीन हस्तांतरण प्रकरणे, हक्क अभिलेख, जमीन बँक, भूसंपादन, तक्रार निवारण व्यवस्था, तंत्रज्ञानाचा वापर आणि ई-कार्यालय प्रणाली यासह विविध विषयांचा सविस्तर आढावा घेत महत्त्वपूर्ण निर्देश दिले.

या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, निवासी उपजिल्हाधिकारी आशा संघवी, उपविभागीय अधिकारी उषाराणी देवगुणे-दहिकर, जिल्हा पुनर्वसन अधिकारी एकनाथ पाटील, उपजिल्हाधिकारी कल्पना ठुबे, प्रमोद भामरे, जिल्हा पुरवठा अधिकारी कैलास पवार, गौण खनिज अधिकारी रोहिणी चव्हाण उपस्थित होते. तसेच जिल्ह्यातील सर्व तहसीलदार आणि उपनिबंधक हे दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीस सहभागी झाले होते.

महसूल अभिलेखांच्या देखभाल व गुणवत्तावृद्धीला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचना देताना श्री. खारगे यांनी फेरफार, वारस नोंदी आणि इतर सर्व प्रलंबित नोंदी कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. जमिनीच्या नोंदी अचूक, अद्ययावत आणि त्रुटीमुक्त असतील तर नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होईल. शेतकरी, वारसदार किंवा सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या हक्कांच्या नोंदींसाठी वारंवार कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

शासकीय जमिनी या समाजाच्या विकासासाठीची मौल्यवान संपत्ती असल्याचे सांगत त्यांनी उपलब्ध शासकीय जमिनींची ओळख, नोंदणी, संरक्षण आणि प्रभावी व्यवस्थापनावर विशेष भर दिला. शासकीय जमिनींचा योग्य व नियोजनबद्ध वापर होण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. विशेषतः विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांसाठी, शैक्षणिक संस्थांसाठी, आरोग्य सुविधा केंद्रांसाठी तसेच सार्वजनिक हिताच्या विविध विकास प्रकल्पांसाठी उपलब्ध शासकीय जमिनींचा वापर करण्याबाबत ठोस प्रस्ताव तयार करून शासनाकडे सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

अतिक्रमण निर्मूलन हा महसूल प्रशासनाचा महत्त्वाचा विषय असल्याचे नमूद करत त्यांनी महसूल अभिलेख आणि प्रत्यक्ष जागेतील स्थिती यामधील तफावत दूर करण्यासाठी नियमित पडताळणी करण्याचे निर्देश दिले. शासकीय जमिनींवरील अतिक्रमणांविरुद्ध नियमित, प्रभावी आणि कालबद्ध कारवाई करून सार्वजनिक मालमत्तांचे संरक्षण करावे. विकास कामांसाठी आवश्यक जमीन उपलब्ध राहणे आणि भविष्यातील पिढ्यांसाठी सार्वजनिक संसाधने सुरक्षित ठेवणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व विशेष अभियानांसाठी स्पष्ट कालमर्यादा निश्चित करण्याच्या सूचना देताना त्यांनी प्रत्येक उपक्रमासाठी निश्चित उद्दिष्टे आणि वेळापत्रक ठरविण्याचे निर्देश दिले. निर्धारित कालावधीत उद्दिष्टपूर्ती होण्यासाठी नियमित आढावा, पाठपुरावा आणि जबाबदारी निश्चितीची प्रभावी यंत्रणा उभारण्यावर त्यांनी भर दिला.

जमीन बँक उपक्रमांतर्गत उपलब्ध जमिनींची प्रत्यक्ष पडताळणी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. जमिनींची उपलब्धता, वापरक्षमता आणि सद्यस्थिती यांची खात्री करून जमीन बँकेतील सर्व माहिती अद्ययावत ठेवावी. भविष्यातील विकास प्रकल्प, उद्योग, पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक हिताच्या योजनांसाठी योग्य जमीन उपलब्ध करून देण्यासाठी ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले.

स्वामित्व योजनेअंतर्गत प्रलंबित असलेली सर्व कामे निश्चित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या मालमत्तेचा अधिकृत हक्क प्राप्त होण्यासाठी या योजनेची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

आदिवासी जमीन हस्तांतरणाशी संबंधित प्रकरणे ३० सप्टेंबरपर्यंत निकाली काढण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश देताना त्यांनी आदिवासी बांधवांचे जमीनहक्क सुरक्षित ठेवणे ही प्रशासनाची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी असल्याचे स्पष्ट केले. आदिवासी समाजाच्या जमिनींचे संरक्षण आणि त्यांचे हक्क अबाधित राखण्यासाठी सर्व संबंधित प्रकरणांचा विशेष प्राधान्याने निपटारा करावा, असे त्यांनी सांगितले.

हक्क अभिलेखांशी संबंधित सर्व प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी विशेष अभियान राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. नागरिकांना त्यांच्या मालमत्तेचा स्पष्ट, निर्विवाद आणि कायदेशीर हक्क प्राप्त व्हावा तसेच भविष्यातील वाद कमी व्हावेत, यासाठी ही प्रक्रिया गतीमान करावी, असे त्यांनी निर्देशित केले.

जमिनीच्या मालकी हक्क निश्चितीसंदर्भात धोरणात्मक आराखडा तयार करण्याच्या सूचना देताना त्यांनी मालकी हक्क व्यवस्थेत अधिक स्पष्टता, पारदर्शकता आणि विश्वासार्हता आणण्यासाठी उपाययोजना सुचविण्याचे निर्देश दिले. तसेच अर्धन्यायिक प्रकरणांची संख्या कमी करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय आणि कायदेशीर सुधारणा प्रस्तावित कराव्यात, असे त्यांनी सांगितले.

न्यायालयीन प्रकरणांचा वेळेत निपटारा करण्यासाठी महसूल अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष देण्याच्या सूचना देण्यात आल्या. शासनाची बाजू प्रभावीपणे मांडणे, आवश्यक कागदपत्रांची वेळेत पूर्तता करणे आणि प्रत्येक प्रकरणाचा नियमित पाठपुरावा करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

'विकसित महाराष्ट्र' दृष्टीपत्राच्या अनुषंगाने नागरिकांचे जीवन अधिक सुलभ करणे आणि उद्योग-व्यवसायांसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी महसूल विभागाने आपले योगदान निश्चित करावे, असे श्री. खारगे यांनी नमूद केले. नागरिकांना सेवांसाठी अनावश्यक विलंब आणि अडचणींना सामोरे जावे लागू नये तसेच उद्योग, गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीसाठी पोषक वातावरण निर्माण व्हावे, यासाठी महसूल यंत्रणेने सक्रिय भूमिका बजावावी, असे त्यांनी सांगितले.

महसूल अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, कुळकायदा आणि संबंधित शासन निर्णयांचा नियमित अभ्यास करावा, असे निर्देश देताना त्यांनी प्रत्येक सोमवारी महत्त्वाच्या शासन निर्णयांचे वाचन, चर्चा आणि अभ्यास सत्र आयोजित करण्याची सूचना केली. कायद्यांचे अद्ययावत ज्ञान आणि योग्य अंमलबजावणी यामुळे प्रशासनाची कार्यक्षमता वाढेल आणि निर्णय प्रक्रियेत सुसंगती येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

कुळकायद्यातील तरतुदींचा सखोल आढावा घेऊन आवश्यक सुधारणा सुचविण्याच्या सूचना देण्यात आल्या. बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि कृषी परिस्थितीनुसार कायदे अधिक प्रभावी, व्यवहार्य आणि नागरिकहितकारी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

जिल्हाधिकारी स्तरावर महसूल विषयक आढावा, भूसंपादनाची कामे, नगरपालिका मुख्याधिकारी यांच्यासोबत समन्वय बैठका तसेच भूमिअभिलेख विभागाच्या बैठका नियमित घेण्याचे निर्देश देण्यात आले. विविध विभागांमध्ये समन्वय वाढल्यास विकासकामांना गती मिळेल आणि प्रलंबित प्रश्न सोडविणे अधिक सुलभ होईल, असे त्यांनी सांगितले.

तालुका स्तरावर तहसीलदार, उपअधीक्षक भूमिअभिलेख आणि दुय्यम निबंधक यांच्यात नियमित समन्वय बैठका आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच प्रत्येक तहसीलदाराने आठवड्यातून किमान एक दिवस क्षेत्रीय दौरा करून गावपातळीवरील परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घ्यावा, नागरिकांशी संवाद साधावा आणि स्थानिक समस्यांच्या निराकरणासाठी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी निर्देशित केले.

नागरिकांच्या तक्रारी आणि निवेदनांच्या प्रभावी निवारणासाठी स्वतंत्र मागोवा प्रणाली विकसित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्राप्त झालेल्या प्रत्येक निवेदनाची कार्यवाही कोणत्या टप्प्यावर आहे, याची माहिती नागरिकांना ऑनलाइन उपलब्ध व्हावी. प्रशासनातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्यासाठी ही व्यवस्था महत्त्वाची ठरेल, असे त्यांनी नमूद केले.

विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांशी थेट संपर्क साधण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले. लाभार्थ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळत आहे का, अडचणी कोणत्या आहेत आणि सेवांमध्ये आणखी कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत याबाबत अभिप्राय घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. शासन आणि लाभार्थी यांच्यातील संवाद अधिक मजबूत करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरेल, असे त्यांनी सांगितले.

कार्यालयीन कामकाजात तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्यावर भर देताना सर्व महसूल कार्यालयांमध्ये ई-कार्यालय प्रणालीचा शंभर टक्के वापर अनिवार्य करण्याचे निर्देश श्री. खारगे यांनी दिले. कागदविरहित, पारदर्शक, गतिमान आणि उत्तरदायी प्रशासन उभारण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर ही काळाची गरज असून, त्याद्वारे नागरिकांना अधिक जलद, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देता येतील, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# महागाईचा 'ताप' वाढला




नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदी राहण्याचा 'विक्रम' नोंदवला याबद्दल भाजप विजयोत्सव साजरा करत आहे. महागाई व बेरोजगारी वाढण्याकडे दुर्लक्ष करून तो जणू महत्त्वाचा मुद्दा नाही असे भासवले जात आहे.

जूनचा महिना अर्धा संपला तरी अजूनही देशाच्या बर्याच भागात मान्सूनचा पाऊस सुरू झालेला नाही. प्रशांत महासागरात 'एल निनो'चा उदय झाल्याची बातमी सर्वांना धडकी भरवणारी आहे. त्यातच मे महिन्यात महागाईवाढीचा दर ३.९३ टक्के झाल्याचे वृत्त सामान्यांची चिंता वाढवणारे आहे. ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित या दरास 'किरकोळ महागाई वाढीचा' दर म्हटले जाते. एप्रिलमध्ये तो ३.४८ टक्के होता, त्यात ०.७५ टक्के वाढ झाली आहे. महागाईवाढ मोजण्याचे आधार वर्ष २०१२ असो किंवा २०२४, तब्बल पाऊण टक्का वाढ ही गेल्या १६ महिन्यांतील सर्वाधिक आहे. अन्न-धान्य व खाद्य पदार्थ, माल वाहतूक, हॉटेल (रेस्टॉरंट) सेवा यांचे दर वाढल्याने महागाई वाढीचा दर उंचावला आहे. खाद्यपदार्थ गटाची महागाई ०.९२ टक्क्यांनी वाढून तो दर ४.७८ टक्के झाला आहे. त्यातही टोमॅटोचे दर गेल्या वर्षीच्या मे महिन्याच्या तुलनेत ४८ टक्क्यांनी आणि आल्याचे दर ३२ टक्क्यांनी वाढले आहेत. देशाच्या अनेक भागांत उष्णतेच्या लाटा आल्याने नाशवंत कृषीमालाचे दर वाढले आहेत. कच्च्या मालाची दरवाढ उत्पादक ग्राहकांवर लादत आहेत. त्यामुळेच एप्रिलमध्ये घाउक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई वाढीचा दर ८.३ टक्के झाला. महागाईतील वाढ लवकर थांबण्याची चिन्हे नाहीत.

### एल् निनोचा धोका


स्वयंपाकाच्या गॅसचा घरगुती व व्यावसायिक सिलिंडर, पेट्रोल व डिझेल, वाहनांचा सीएनजी या सर्वांचे केंद्र सरकारने अलीकडे वारंवार दर वाढवले. पश्चिम आशियातील युद्धामुळे खनिज तेलाचे दर वाढल्याने ही दरवाढ अपरिहार्य असल्याचे सरकार सांगत आहे. अमेरिका व इराण यांच्यात युद्ध बंदीचा करार होण्याची शक्यता असली तरी तो किती काळ टिकेल ते सांगता येत नाही. परस्परांवरील हल्ले दोघांनी थांबवले तरी त्या भागातील परिस्थिती लगेच सामान्य होणार नाही. होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यावर एकमत झाले तरी त्या क्षणी तेथून जहाजांची ये-जा सुरू होणार नाही. अर्थातच भारताची निर्यात घटलेली असेल आणि आयातीवरही परिणाम होणार आहे. स्वयंपाकाचा गॅस असो किंवा पेट्रोल-डिझेलचे दर असोत ते वाढण्याची शक्यता जास्त आहे. या इंधनांच्या विक्रीवर निर्बंध सरकारने आणले आहेतच. माल वाहतूक त्यामुळे आणखी महागेल आणि सर्व वस्तू आणखी महागत जातील हे निश्चित दिसत आहे. 'एल निनो' सक्रिय झाला आहे आणि जून ते सप्टेंबर या काळात त्याचा प्रभाव वाढणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. पावसाळ्याचा हाच काळ देशासाठी, शेतीसाठी महत्त्वाचा असतो. सरासरीच्या सुमारे १० टक्के कमी पाऊस होण्याचा अंदाज आहे. त्याचा परिणाम शेतीचे उत्पादन घटण्यात होणार आहे. अन्न-धान्य, फळे यांचे उत्पादन कमी झाल्यावर त्यांचे दर तर वाढतीलच; पण त्यावर आधारित उत्पादनेही महाग होतील. जूनमध्ये किरकोळ महागाईवाढीचा दर ४.५ टक्क्यांपर्यंत जाण्याचा अंदाज आताच तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. रिझर्व बँकेच्या दृष्टीने ६ टक्क्यांपर्यंतचा महागाईवाढीचा दर 'सामान्य' किंवा २ ते ६ टक्के या त्यांच्या अपेक्षित मर्यादेत असला तरी त्याचे सामान्य माणसावर होण-ारे परिणाम त्रासदायक असतात. चालू आर्थिक वर्षात विकासदराचा अंदाज रिझर्व बँकेने घटवून ६.९ वरून ६.६ टक्के केला आहे; पण 'फिच' या पतमानांकन संस्थेने तो ६.४ टक्के राहील, असे भाकित केले आहे. खाद्यपदार्थ व इंधन हे गट वगळता 'गाभा महागाई वाढीचा' दर ३.९ टक्के झाला आहे, तो ४.७ टक्क्यांपर्यंत वाढेल, असा खुद्द रिझर्व बँकेचा अंदाज आहे. प्रत्यक्ष महागाई त्यापेक्षा बरीच जास्त असेल. काम किंवा रोजगार करणार्या व्यक्तींची संख्या (वय वर्षे १५ पेक्षा जास्त) गेल्या दहा वर्षांत ४२.७ वरून ३८.७ टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे. याचा अर्थ बेरोजगारी वाढली आहे. युद्ध बंदीच्या शक्यतेने शेअर बाजार उसळला याचा अर्थ अर्थव्यवस्था सुधारली असा होत नाही. गेल्या नोव्हेंबरपासून किरकोळ महागाई वाढत आहे. सामान्य माणसाचे रोजचे जगणे त्यामुळे दुष्कर होत आहे. तीव्र उन्हाबरोबरच महागाईच्या तापात तो होरपळून निघत आहे.

# पेरियार: द्रविड चळवळीचे प्रणेते आणि महान समाजसुधारक



पेरियार (ई. व्ही. रामासामी) हे एक द्रविड चळवळीचे प्रणेते आणि महान समाजसुधारक होते त्यांनी तमिळनाडूमध्ये सामाजिक न्याय, विवेकवाद, स्त्री-स्वातंत्र्य आणि जात-निर्मूलनासाठी आयुष्यभर लढा दिला त्यांचे क्रांतिकारी विचार खालीलप्रमाणे आहेत:१. विवेकवाद आणि स्व-मूल्यांकन मी जे सांगितले ते डोळे झाकून स्वीकारू नका. मी जे सांगतो ते योग्य आहे का, यावर स्वतःच्या बुद्धीने आणि सद्सद्विवेकबुद्धीने विचार करा. माझ्या बुद्धीला पटेल तेच मी बोलतो. कोणत्याही ग्रंथात लिहिले आहे किंवा मी स्वतः सांगितले आहे, तरीही ते जर तुमच्या बुद्धीला आणि सामान्य ज्ञानाला पटत नसेल, तर त्यावर अजिबात विश्वास ठेवू नका.२. धर्म आणि अंधश्रद्धा -देव नाही, देव अजिबात नाही. ज्याने देवाचा शोध लावला तो मूर्ख आहे, जो देवाचा प्रचार करतो तो बदमाश आहे आणि जो देवाची पूजा करतो तो रानटी आहे.धर्मग्रंथ म्हणजे आपल्या मेंदूला लागलेली कीड (वाळव आहे. ही पुस्तके माणसाला गुलाम असल्याची जाणीव करून देतात आणि विष पेरतात.३. स्त्री-मुक्ती -'पुरुषत्व' हा शब्दच मुळी स्त्रियांना हीन लेखण्यासाठी बनवला आहे. ही संकल्पना नष्ट केल्याशिवाय स्त्रियांना स्वातंत्र्य मिळणार नाही.४. जात आणि समता -स्वाभिमान नसलेली व्यक्ती आणि समाज कधीही प्रगती करू शकत नाही. खरा देश स्वतंत्र तेव्हाच होईल, जेव्हा समाजात कोणताही 'शूद्र' राहणार नाही आणि शोषण थांबेल.५. भाषेवरील प्रेम- ज्याला आपल्या मातृभाषेवर प्रेम नाही, त्याला आपल्या भूमीवरही प्रेम नाही.

# विश्वनिर्मिती संकल्पना



विश्वनिर्मितीबद्दल वेगवेगळ्या शास्त्रज्ञांनी विश्वाच्या उत्पत्तीविषयी तीन सिद्धांत मांडले. त्यांपैकी प्रचलित अस-लेला सिद्धांत हा प्रसरणशील विश्व हा आहे. अब्जावधी वर्षांपूर्वी एखाद्या वायूच्या अतिशय तप्त व प्रचंड महाकाय गोळ्यांचा महाभयंकर असा स्फोट होऊन विश्व निर्माण झाले.

यशश्री या अभ्यासू व जिज्ञासू मुलीला एक विज्ञ-ानपरी भेटते. यशश्री ही बुद्धीने खूपच हुशार असते. ती परीला आपल्या आकाशासंबंधी विविध प्रश्न विचारीत असते. परीही तिच्या प्रश्नांची उत्तरे देत असते. परीताई आपण अवकाशात म्हणतो म्हणजे आकाशातच ना गं? त्यातच तर आकाशगंगा आहेत ना? यशश्रीने परीला प्रश्न केले. म्हणजे आपल्या या अवकाशात अनेक आकाशगंगा आहेत. हे तर तुला माहीतच आहे. हो बाबांनी कालच सांगितले मला. पण अवकाशात व आकाशात काय फरक आहे? यशश्रीने विचारले नाही. आकाशाचा त्याहीपेक्षा खूप मोठा अफाट विस्तार म्हणजेच अवकाश. आकाश आणि अवकाश या दोन संज्ञांमध्ये बराच फरक आहे.

ती परी सांगू लागली, आपण दिवसा डोळ्यांनी जे बघतो ते आकाश असते. रात्री त्या आकाशापारचे विशाल असे अवकाश आपणास दिसते. रात्रीलाही अवकाश आपल्या डोळ्यांनी फारच कमी दिसते. दुर्बिणीतून मात्र बरेच विस्तीर्ण असे अवकाश बघता येते व आपणास खूप छान छान चांदण्या म्हणजे तारे दिसतात.

हे अवकाश म्हणजे काय असते परीताई? यशश्रीने विचारले. परी सांगू लागली, विश्वा-तील साऱ्या वस्तू ज्या अतिविशाल पोकळीत फिरतात त्या पोकळीला अवकाश म्हणतात. अवकाश ही एक आकाशापेक्षाही खूप मोठी अफाट अशी निर्वात पोकळी आहे.

त्यात असंख्य आकाशगंगा आ-हेत. कित्येक तेजोमेघ, कृष्णमेघ व धुळीचेही मेघ आहेत. प्रत्येक आकाशगंगांमध्ये अगणित तारे, ग्रह, उपग्रह, लघुग्रहही आहेत.

त्यांतच धुमकेतू व कृष्णविवरेही आहेत. अशा ह्या अवकाशाला आरंभही नाही व शेवटही नाही.

हे विश्व कसे निर्माण झाले परीताई? यशश्रीने विच-ारले. वेगवेगळ्या शास्त्रज्ञांनी विश्वाच्या उत्पत्तीविषयी तीन सिद्धांत मांडले आहेत. त्यांपैकी जास्त प्रचलित व सर्वमान्य असलेला सिद्धांत हा प्रसरणशील विश्व हा आहे. शास्त्रज्ञांच्या मते पूर्वी अब्जावधी वर्षांपूर्वी एखाद्या वायूच्या अतिशय तप्त व प्रचंड महाकाय गोळ्यांचा महाभयंकर असा स्फोट झाला. त्यालाच शास्त्रज्ञ 'महास्फोट सिद्धांत' म्हणतात. या स्फोटामुळेच विश्व निर्माण झाले व ते स्फोटानंतर प्रसरण पावत मोठ्या होणाऱ्या वायूच्या ढगासारखे मोठे मोठे होऊ लागले. परीने खुलासा केला.

विश्व प्रसरण पावत आहे म्हणजे नक्की काय होत आहे? यशश्रीने शंका काढली. परी म्हणाली, विश्व प्रसरण पावत आहे याचा अर्थ ह्या विश्वातील असंख्य आकाशगंगा या एकमेकींपासून खूप वेगाने दूर जात आहेत. म्हणजे त्यातील पोकळी वाढत आहे.

मग विश्वाची सीमा कोणती आहे? यशश्र-ीने प्रश्न केला. विश्वाला सीमाच नाही.

विश्व हे असीम, अमर्याद, अफाट व अनंत असे आहे. परी उत्तरली. मग अंतराळ व अवकाश यात काय फरक आहे? यशश्रीने फरक विचारला. ते एकच आहे. फक्त नावे दोन आहेत. पृथ्वीच्या वातावरणाच्या बाहेर असलेल्या संपूर्ण अफाट निर्वात मोकळ्या पोकळीस अंतराळ म्हणतात, तर कोणत्याही दोन ग्रहांमधील विशाल अशा निर्वात मोकळ्या पोकळीस अवकाश म्हणतात एवढाच काय तो फरक. परीने उत्तर दिले. अवकाशात पोकळी कशासाठी असेल? तिचा काही उपयोग होतो का? यशश्रीने प्रश्न केला. अवकाशातील पोकळीत अवकाशयाने, कृत्रिम उपग्रह सहजपणे संचार करू शकतात. पोकळी निर्वात असल्यामुळे तेथे कुठल्याही प्रकारचे घर्षण होत नसते. त्यामुळे अवकाशयानांची झीज होण्याचेही टळते. तसेच तेथे धूलिकण नसल्याने सर्व अवकाश हे एकदम स्वच्छ असते. त्यामुळे माणसाची नजर सहजगत्या दूरवर पोहोचते व अवकाशवीर दूरवरचेही निरीक्षण सहज करू शकतात. परीने सांगितले. वैश्विक किरण कसे असतात परीताई? यशश्रीने प्रश्न विचारला. अति उच्च उर्जा असलेल्या ऋणविद्युतभारित कणांचा प्रवाह म्हणजे विश्वकिरण. विश्वात जवळपास सूर्यप्रकाशाच्या वेगानेच जाण-ारे जे किरण असतात त्यांना वैश्विक किरण वा विश्व किरण किंवा अंतरिक्ष किरण अथवा अनंत किरण वा ब्रम्हांड किरणसुद्धा म्हणतात. ते अतिशय तरल व अतिवेगवान असतात. ते विश्वातून अत्यंत सूक्ष्म अशा कणांच्या स्वरूपात पृथ्वीवर येतात. ज्यावेळी त्यांचा निश्चित उगम माहीत नव्हता त्यावेळी त्यांना विश्वात निर्माण झालेले किरण म्हणून वैश्विक किरण हे नाव देण्यात आले होते; परंतु आधुनिक संशोधनानुसार शास्त्रज्ञांच्या मते नवतारे व अतिनवतारे, सूर्यासारखे काही सामान्य दर्जाचे तारे व आंतर तारकीय मेघ ही विश्वकिरणांची उगमस्थाने असावीत. परीने सविस्तर स्पष्टीकरण दिले. यशश्री, आजच्या दिवस एवढे पुरेसे झाले. आता काही माहिती मी तुला उद्या सांगेल. असे म्हणून परी निघून गेली. बरे असे काही नाही की ती फक्त बुद्धीनेच हुशार होती. तिच्या अंगी कलागुणांची खाण होती. त्यामुळे शिक्षकांची ती आवडती विद्यार्थिनी बनली.

**कथा : प्रा. देवबा पाटील**

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



दिवसातून फक्त दोनवेळा जेवण घेतलं पाहिजे आणि कमी जेवण्यापेक्षा कमी वेळा जेवणं गरजेचं आहे असंही डॉ. दीक्षित म्हणाले. दोनवेळा जेवतानाही ते जास्तीत जास्त ५५ मिनिटांमध्ये संपवणं गरजेचं आहे. हा डाएटप्लॅन फॉलो केल्यास वजन कमी होईल, पोटाचा घेर कमी होईल, रक्तातील तीन महिन्यातील कळणारं साखरेचं प्रमाण कमी होईल आणि फास्टिंग शुगरही कमी होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. एकदा जेवतो तो योगी, दोनवेळा जेवतो तो भोगी आणि तीनवेळा जेवतो तो रोगी अशी संतांची शिकवण आहे,याचाही दाखला त्यांनी दिला. आहारात हे बदल केल्यामुळे वजन कमी होईल, पोटाचा घेर कमी होईल असा विश्वास त्यांनी कट्ट्यावर व्यक्त केला.

## २ Joke — विनोद




**विमानात बसलेला एक अमेरिकन माणूस भारतीय माणसाला म्हणतो, ङ्गतुमच्या कोटाचे वरचे बटण तुटले आहे. जरा लावून घ्या.**

**त्यावर भारतीय माणूस म्हणतो, ङ्गतुम्ही लोक दुसऱ्याच्या गोष्टीत फार लक्ष घालता, तुमच्या हातातल्या चिरुटमुळे तुमचा कोट जळतोय, तरी मी काही बोललो का?**

## ३ Message — संदेश



santa ka beta: Sirji, jab aap paath padaate ho, to mujhe mere pitaa ki yaad aati hai.
Sirji: achchi baath hai. kis-liye unki yaad aati hai?
santa ka beta: unko bhi aap hi ke jaise padaana nahi aata hai.

## ४ Thought — सुविचार




व्यक्तीया छायेप्रमाणे विरून जातात, पण राष्ट्र मात्र ास्थिर आणि शाश्वत टिकून राहते.- ई. बुर्क

**संस्कृत सुभाषित**

अन्योन्यसमुपष्टम्भादन्योन्यापाश्रयेण च
ज्ञातय: संप्रतवर्धन्ते सरसीवोत्पलान्युत ।।
(उद्योगपर्व, अध्याय ३६, ोक ३६, महाभारत)
अर्थ - तळ्यात वाढणाऱ्या कमळाप्रमाणे, परस्परांस सहाय्य करून व परस्परांचा आश्रय घेऊन समुदायाचा उत्कर्ष होत असतो

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. मराठीत जोकर
३. वार्ताहर
७. वस्तू मिळाल्याची पोहोच
९. नकाराचा शब्द
१०. कंटाळा आल्याचे दाखवणारी (अ.व.)
११. गतिमान
१३. आबालवृद्धांसाठी उपयोगी कल्प-त्यातील वनस्पती
१६. मुलींचे हे नाव बेळगावी मिठाईवरून ठेवतात की नाजुकशा फुलावरून?
१७. गडीमाणसे
२१. पद्धत
२३. कंटाळवणे, रसहीन
२५. 'च'च्या भाषते फुकट
२७. राष्ट्राची सीमा
२९अ. संधी, मोका
३१. विश्वासघातकी
३२. खेळातून बाद, हद्दपार
३३. पदर
३४. दबा धरणे
३६. किरकोळ
३९. नऊ दिवसच टिकणारे अप्रूप!
४२. लबाडीचा हेतू
४२अ. कच्चे लिखाण (इंग्रजी)
४४. कणखर, रांगडा
४५अ. सोंगट्या मांडण्याचे वस्त्र
४६. एकाग्र नजर
४८. सजीव-निर्जीव सर्व
५०. रागाचा उद्रेक
५२. एक जंगली फूल
५३. चित्रविचित्र रंगाचा, ठिपक्या ठिपक्यांचा
५४. एक प्रकारे जीवनदान!
५६अ. मन आकर्षून घेणारे
५७अ. कूळकायद्याचे मूळ तत्त्व
६१. तात्काळ, वेगात
६४. सारखा
६६. किटाळ, आळ
६८. पावलोपावली
६९. संत एकनाथांचे गुरु
७१. 'बटण स्टार्ट'मुळे आता ही कालबाह्य! (इंग्रजी)
७२. पावसाची झड
७३. नवरत्नांपैकी प्राणिज रत्न
७४. कारस्थानी
७५. पाताळ, विनाशाची गर्ता
७६. अभिप्राय

### उभे शब्द

१. सर्वनाश घडवून आणणारे
२. कन्या (संस्कृत)
३. बोरींच्या गावचे काटेरी झाड
४. काव्यात त्याला
५. वैरी, खटला गुदरणारा
६. अंगातील मस्ती, जोम
७. जन्मदाता
८. अशुभ घटनेचा संशय दर्शवणारा वाकप्रचार
१२. 'बोलीची काढी- बोलाचाच भात' रांधणारा!
१४. उपवासाचे तांदूळ
१५. साग्रसंगीत
१८. मांडणी
१९. मिसळीतील तर्री
२२. ईर्ष्या, ठाम निश्चय
२४. टाळाटाळ, चुकवाचुकव
२६. वार
२८. तडीपार
२९. मिठाची चव
२९अ. अमावस्या
३०. वारा (संस्कृत)
३१. होमातील आहुती
३२अ. चकवून जाण्याचा मार्ग
३५. सैन्याची तुकडी
३७. घाबरणे, धास्ती घेणे
३८. तफावत, अंतर
३८अ. कणखर (इंग्रजी)
४०. जंगलातील प्राणी
४१. मुलींचे एक नाव
४२. कंप पावणारा
४३. केर
४५. शेवटचे वस्त्र!
४६. पहिला अंक
४७. शेंगेवरील आवरण
४९. संघर्षात रक्त सांडणे
५१. घटस्फोट
५३. दगडाचा पातळ पापुद्रा
५५. गव्हाचे शिजवलेले सत्त्व
५६. खळबळजनक
५८. सेनानायक
५९. राजीनामा
६०. हिंदीतील मूळ, मराठीत वजनदार
६१अ. धान्य साठवणीचे पात्र
६२. डागाळलेला
६३. स्पष्टवक्ता, तोंडाळ
६५. मनगटात जोर असलेला
६७. आपला देश
६९. सततचे नामस्मरण
७०. पुरुष
७२. समान, तुल्यबळ

### आडवे उत्तर

१.विदूषक ३.बातमीदार ७.जमापावती ९.नाही १०.जांभया ११.वेगवान १३.शतावरी १६.कुंदा १७.चाकरचुकर २१.रीत २३.रटाळ २५.चकटफू २७.सरहद्द २९अ. अवसर ३१.हरामखोर ३२.कटाप ३३.पालव ३४.टपणे ३६.सटरफटर ३९.नवलाई ४२.कावा ४२अ.रफ ४४.राकट ४५अ. पट ४६.एकाटक ४८.चराचर ५०.फणकारा ५२.कणेर ५३.कबरा ५४.रक्तदान ५६अ.मोहक ५७अ.कसेल त्याची जमीन ६१.तडकफडक ६४.सम ६६.बालंट ६८.पदोपदी ६९.जर्नादन ७१.किक ७२.सर ७३.मोती ७४.कपटी ७५.रसातळ ७६.मत

### उभे उत्तर

१.विनाशक २.दुहिता ३.बाभळी ४.तया ५.दावेदार ६.राग ७.जनक ८.पाल चुकचुकणे १२.वाचाळ १४.वरी १५.रीतसर १८.रच १९.कट २२.जिद्द २४.टालमटोला २६.घाव २८.हद्दपार २९.खारट २९अ.अवस ३०.समीर ३१.हवन ३२अ.पळवाट ३५.पलटण ३७.टरकणे ३८.फरक ३८अ. टफ ४०.वनचर ४१.ईरा ४२.कापरा ४३.कचरा ४५.कफन ४६.एक ४७.टरफल ४९.रक्तपात ५१.काडीमोड ५३.कपची ५५.चीक ५६.सनसनाटी ५७.हक ५८.सेनापती ५९.त्यागपत्र ६०.जड ६१अ.डबा ६२.कलंकित ६३.फटकळ ६५.मर्द ६७.भारत ६९.जप ७०.नर ७२.सर




## थोडक्यात/ संक्षिप्त

### धीरज बोम्मदेवरा-कुमकुमची सोनेरी कामगिरी !
### ऑलिम्पिक विजेत्यांना नमवत जिंकले गोल्ड !

मुंबई–तिरंदाजी विश्वचषक २०२६ मधून भारतासाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. भारताचा धीरज बोम्मदेवरा आणि कुमकुम मोहोड या जोडीने तिरंदाजी विश्वचषक २०२६ च्या तिसऱ्या फेरीत ऑलिम्पिक विजेत्यांना हरवत सुवर्णपदक पटकावले आहे. तुर्कीतील अंताल्या येथे झालेल्या अंतिम सामन्यात भारताने विद्यमान ऑलिम्पिक विजेता दक्षिण कोरियाचा ५–१ असा पराभव करत जेतेपदक पटकावले आहे. अंतिम सामन्यात भारतासमोर दक्षिण कोरियाची बलाढ्य जोडी ओह ये–जिन आणि किम जे–डिओक यांचे आव्हान होते. मात्र धीरज आणि कुमकुम यांनी सुरुवातीपासूनच अचूक लक्ष्यभेद करत सामन्यावर नियंत्रण ठेवले. भारताने पहिल्या दोन सेटमध्ये अनुक्रमे ३७–३६ आणि ३७–३६ अशी एक–एक गुणांच्या फरकाने बाजी मारली. त्यामुळे भारताने ४–० अशी आघाडी घेतली. तिसरा सेट ३९–३९ असा बरोबरीत सुटल्याने कोरियाला एक गुण मिळाला, मात्र भारताने ५–१ ने सामना जिंकत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले आहे. निर्णायक क्षणी धीरज बोम्मदेवराने जबरदस्त अचूकता दाखवत शेवटचे दोन बाण थेट परफेक्ट १० मध्ये मारले.

### क्रीडा जगताला कलंक!
### जगप्रसिद्ध क्रिकेटपटूने पत्नीला गोळ्या झाडून संपवले

मुंबई–क्रिकेटला जंटलमन्स गेम म्हणून ओळखले जाते. शिस्त, संयम आणि खिलाडूवृत्ती हे या खेळाचे दागिने आहेत. पण याच खेळाच्या इतिहासात एक असं पानही जोडले गेले आहे, एका आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वेगवान गोलंदाजाने रागाच्या भरात आपल्याच पत्नीला गोळ्या झाडून संपवलं आणि या गुन्ह्यासाठी त्याला थेट फाशीच्या सुळावर चढावं लागले. क्रिकेट जगताला हादरवून सोडणारी ही सत्यकथा वेस्ट इंडिजचे माजी क्रिकेटपटू लेस्ली हिल्टन यांची आहे.१९३० आणि १९४० च्या दशकात वेस्ट इंडिजच्या संघात लेस्ली हिल्टन यांच्या नावाचा दबदबा होता. एक उत्कृष्ट वेगवान गोलंदाज म्हणून त्यांनी वेस्ट इंडिजसाठी ४० कसोटी सामने खेळले. त्यांच्या घातक गोलंदाजीसमोर भलेभले फलंदाज ढेपाळायचे. मैदान गाजवणाऱ्या या खेळाडूच्या वैयक्तिक आयुष्यात १९४२ मध्ये एक मुलगी आली. दोघांनी लग्न केले आणि सुखाचा संसार सुरू झाला. मात्र, हे सुख फार काळ टिकू शकले नाही. काही वर्षातच त्यांच्या नात्यात संशयाचे भूत शिरले. हिल्टन यांना काही अशी पत्रे आणि संदेश मिळाले, ज्यामुळे त्यांच्या पत्नीचे अनैतिक प्रेमसंबंध असल्याचा संशय बळावला.

### दुबेने मोक्याच्या क्षणी फेकली विकेट, तिथेच गेम फिरवला

मुंबई–ऐतिहासिक वानखेडे स्टेडियमवर प्रेक्षकांच्या अलोट गर्दीत पार पडलेल्या टी–२० मुंबई लीगच्या रोमांचक अंतिम सामन्यात गतविजेत्या मुंबई साउथ सेंट्रल मराठा रॉयल्सने आपला दबदबा कायम राखला आहे. शनिवारी झालेल्या या अंतिम लढतीत मराठा रॉयल्सने आर्क्स अंधेरी संघावर ८ धावांनी मात करत सलग दुसऱ्यांदा विजेतेपदावर आपले नाव कोरले. चिन्मय सुतारचे झुंजार अर्धशतक आणि तुषार देशपांडेच्या नेतृत्वाखालील शिस्तबद्ध गोलंदाजीच्या जोरावर रॉयल्सने हा रोमहर्षक विजय साकारला.दुसरीकडे, याच दिवशी महिलांच्या क्रिकेटमध्येही नवा इतिहास रचला गेला. पहिल्या टी–२० मुंबई महिला लीगच्या अंतिम सामन्यात सोबो मुंबई फाल्कन्सने उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर आकाश टायगर्स मुंबई वेस्टर्न सबर्ब्स संघाला २५ धावांनी पराभूत करून ऐतिहासिक विजेतेपद पटकावले. इतर अनेक मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. ३१,००० हून अधिक क्रिकेट चाहत्यांच्या उपस्थितीत खेळल्या गेलेल्या पुरुषांच्या अंतिम सामन्यात आर्क्स अंधेरीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अर्जुन तेंडुलकरने सुरुवातीलाच अचूक मारा करत मराठा रॉयल्सला दोन मोठे झटके दिले.

# अमेरिकाचा ४–१ ने पेराग्वेवर दणदणीत विजय

लॉस एंजेलिस : फिफा विश्वचषक २०२६ च्या दुसर्या दिवशी यजमान देश अमेरिका आणि कॅनडाने आपल्या मोहिमेची दमदार सुरुवात केली. उच्च दर्जाच्या फुटबॉलने रंगलेल्या या दिवसात अमेरिकेने पराग्वेचा ४–१ असा एकतर्फी पराभव करत स्पर्धेत आपला प्रभाव स्पष्ट केला, तर कॅनडाने बोस्निया–हर्जेगोव्हिनाविरुद्ध १–१ अशी बरोबरी साधत आपल्या गोलचा दुष्काळ संपवला.

लॉस एंजेलिस स्टेडियमवर झालेल्या सामन्यात अमेरिका सुरुवातीपासूनच आक्रमक दिसली. फोलारिन बालोगुन याने उत्कृष्ट फॉर्म दाखवत दोन गोल झळकावले. त्याच्या आक्रमक खेळाला ख्रिश्चन पुलिसिक याच्या सर्जनशील पासिंग आणि प्लेमेकिंगची उत्तम साथ मिळाली. पहिल्या हाफमध्येच अमेरिकेने तीन गोल करत ३–० अशी भक्कम आघाडी घेतली आणि सामना जवळपास निश्चित केला. अमेरिकेच्या वेगवान आक्रमणासमोर पराग्वेचा बचाव निष्प्रभ ठरला. दुसर्या हाफमध्येही अमेरिकेने आपला दबदबा कायम ठेवत अतिरिक्त वेळेत आणखी एक गोल केला आणि सामना ४–१ ने जिंकत स्पर्धेतील आपल्या अभियानाची प्रभावी सुरुवात केली. या विजयामुळे अमेरिका संघाने घरच्या मैदानावर विश्वचषकातील सर्वात प्रभावी सुरुवातींपैकी एक नोंदवली.अमेरिकेने या सामन्यात आक्रमक आणि संतुलित खेळ दाखवत चाहत्यांना आनंद दिला. प्रशिक्षकांच्या नव्या रणनीतीचा प्रभाव स्पष्ट दिसून आला. पहिल्या हाफमध्ये ३–० अशी आघाडी ही विश्वचषक इतिहासातील अमेरिकेची सर्वात मोठी हाफ–टाइम आघाडी ठरली.

कॅनडाची सकारात्मक सुरुवात

दरम्यान, टोरंटोमध्ये झालेल्या सामन्यात कॅनडाने बोस्निया–हर्जेगोव्हिनासोबत १–१ अशी बरोबरी साधली. सायल लॅरिन याने केलेला गोल कॅनडासाठी ऐतिहासिक ठरला, कारण हा त्यांच्या विश्वचषक इतिहासातील मोजक्या गोलांपैकी एक होता. याआधी कॅनडाला आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये गोलसाठी संघर्ष करावा लागत होता, त्यामुळे हा गोल संघासाठी मोठा दिलासा ठरला. दुसरीकडे, कॅनडाने बचाव आणि आक्रमण यामध्ये सुधारणा दाखवत भविष्यातील सामन्यांसाठी सकारात्मक संकेत दिले. एकूणच, यजमान देशांसाठी विश्वचषकाची सुरुवात उत्साहवर्धक ठरली असून पुढील सामने अधिक रोमांचक होण्याची अपेक्षा आहे.



# भारत–पाकिस्तान लढत

महिला टी–२० विश्वचषक स्पर्धा

बर्मिंगहॅम : महिला टी–२० विश्वचषक २०२६ मध्ये क्रिकेटप्रेमींचे लक्ष वेधून घेणारा भारत आणि पाकिस्तान यांच्यातील बहुप्रतिक्षित सामना आज रविवारी (१४ जून) एजबॅस्टन स्टेडियमवर रंगणार आहे. भारतीय महिला संघ या स्पर्धेतील आपल्या मोहिमेची सुरुवात कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्ध विजयाने करण्याच्या निर्धाराने मैदानात उतरणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार सायंकाळी ७ वाजता सुरू होणार असून, नाणेफेक साडेसहा वाजता होईल. भारतीय संघाचे नेतृत्व हरमनप्रीत कौर करणार आहे, तर पाकिस्तानच्या संघाची धुरा फातिमा सना सांभाळणार आहे.क्रिकेट चाहत्यांना हा सामना स्टार स्पोर्ट्सच्या विविध वाहिन्यांवर थेट पाहता येणार आहे. तसेच मोबाईल आणि इतर डिजिटल माध्यमांवर जिओ हॉटस्टार ॲपद्वारे सामन्याचे थेट प्रक्षेपण उपलब्ध असेल.



महिला टी–२० विश्वचषकाच्या इतिहासात भारत आणि पाकिस्तान हे संघ आतापर्यंत आठ वेळा आमनेसामने आले आहेत. यामध्ये भारताने सहा सामने जिंकले असून पाकिस्तानला दोन विजय मिळवता आले आहेत. २०२४ च्या विश्वचषकातील शेवटच्या लढतीतही भारताने पाकिस्तानवर सहा विकेट्स राखून विजय मिळवला होता. आमनेसामनेच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास भारतीय संघाचे पारडे जड दिसत असले, तरी विश्वचषकातील भारत–पाकिस्तान सामना नेहमीच रोमांचक ठरतो. त्यामुळे या हाय–व्होल्टेज लढतीकडे जगभरातील क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.

फातिमा सनाच्या दुखापतीवर पडदा; भारताविरुद्ध खेळण्यास तयार

भारत आणि पाकिस्तान यांच्यात आज रविवारी (१४ जून) होणार्या महिला टी–२० विश्वचषकातील बहुचर्चित सामन्यापूर्वी पाकिस्तानच्या कर्णधार फातिमा सनाच्या दुखापतीमुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, फातिमाने स्वतः आपण पूर्णपणे ठीक असल्याचे सांगत संघ आणि चाहत्यांना दिलासा दिला आहे. पाकिस्तानच्या सराव सत्रादरम्यान फलंदाज आयशा जफरने मारलेला जोरदार फटका फातिमा सनाच्या गुडघ्याला लागला. चेंडू लागल्यानंतर तिला तीव्र वेदना झाल्या आणि ती काही काळ मैदानावरच बसून राहिली. संघाचे फिजिओ आणि सहकारी खेळाडूंनी तातडीने तिची पाहणी केली. त्यानंतर फातिमाने उजव्या गुडघ्यावर बर्फाची पट्टी लावून विश्रांती घेतली आणि उर्वरित सराव सत्रात सहभाग घेतला नाही. मात्र, सुमारे ४५ मिनिटांनंतर ती कोणत्याही मोठ्या अडचणीशिवाय चालताना दिसली. सामन्यापूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत फातिमाने दुखापत किरकोळ असल्याचे स्पष्ट केले. तो चेंडूचा सामान्य फटका होता. आयशाने फटका मारला आणि चेंडू माझ्या गुडघ्याला लागला. आता मी पूर्णपणे ठीक आहे, असे ती म्हणाली.

# नीरज चोप्राची डायमंड लीगमधून माघार



नवी दिल्ली : भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रा पाठीच्या दुखापतीतून अद्याप सावरलेला नसल्याने १९ जून रोजी होणार्या दोहा डायमंड लीगमध्ये तो सहभागी होणार नाही. टोकियो २०२० ऑलिम्पिकमध्ये सुवर्ण आणि पॅरिस २०२४ ऑलिम्पिकमध्ये रौप्यपदक जिंकलेल्या चोप्राने गेल्या वर्षी दोहा डायमंड लीगमध्ये ९० मीटरचा टप्पा ओलांडला होता. नीरजने स्वित्झर्लंडमधील बिएन येथे त्याचे फिजिओ इशान मारवाहा आणि प्रशिक्षक जय चौधरी यांच्यासोबत ४७ दिवसांच्या ऑफ–सीझन प्रशिक्षण शिबिरात सहभाग घेतला. पॅरिस ऑलिम्पिक विजेता पाकिस्तानचा अर्शद नदीम, त्रिनिदाद आणि टोबॅगोचा विद्यमान विश्वविजेता केशॉर्न वॉलकॉट आणि श्रीलंकेचा रुमेश तरंगा पाथिराग, ज्याने नुकतेच रोम डायमंड लीगमध्ये ९२.६२ मीटर भाला फेकला.



# कूपर कॉनलीची दीडशतकी खेळी; ऑस्ट्रेलियाने संघर्षमय विजय मिळवत राखली लाज

मुंबई–कूपर कॉनलीच्या पहिल्यावहिल्या वनडे शतकाच्या बळावर ऑस्ट्रेलियाने बांगलादेशविरुद्धच्या वनडे मालिकेत चारीमुंड्या चीत होण्याची अवस्था टाळली. मीरपूर इथे झालेल्या तिसऱ्या आणि शेवटच्या वनडेत ऑस्ट्रेलियाने एका विकेटने विजय मिळवला. ऑस्ट्रेलियाला एकेक धावेसाठी प्रचंड संघर्ष करावा लागला. डावखुरा शतकवीर कूपर कॉनली या विजयाचा शिल्पकार ठरला. बांगलादेशने तीन सामन्यांची मालिका २–१ अशी जिंकली. बांगलादेशचा ऑस्ट्रेलियाविरुद्ध हा पहिलाच मालिका विजय आहे.बांगलादेशने टॉस जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. लिट्टन दास, तौहिद हृदॉय आणि मोसादेक होसेन यांच्या अर्धशतकांच्या बळावर बांगलादेशने २७४ धावांची मजल मारली. लिट्टनने ४ चौकार आणि २ षटकारांसह नाबाद ५८ धावांची खेळी केली. तौहिदने ८ चौकारांसह ८३ धावांची सुरेख खेळी केली. मोसादेकने ५ चौकार आणि एका षटकारासह नाबाद ५६ धावा केल्या. ऑस्ट्रेलियातर्फे झेव्हियर बार्टलेट आणि मॅट रेनशॉ यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या.प्रत्युत्तरादाखल खेळताना जोश इंगलिस २१ धावा करून बाद झाला. मॅट रेनशॉ भोपळाही फोडू शकला नाही. ॲलेक्स कॅरे ८ धावा करून तंबूत परतला. मॅट शॉर्टला सलग तीन सामन्यात भोपळाही फोडता न आल्याने वगळण्यात आलं. शॉर्टऐवजी कॉनलीला सलामीला पाठवण्यात आलं. कॉनलीने एका बाजूने सहकारी बाद होत असतानाही दिमाखदार शतकी खेळी साकारली. मार्नस लबूशेन (२९), कॅमेरुन ग्रीन आणि ऑलिव्हर पीक यांनी प्रत्येकी २७ धावा करत कूपरला चांगली साथ दिली. कूपरव्यतिरिक्त बाकी फलंदाज धावांसाठी संघर्ष करताना दिसले. १८ चेंडू कॉनली नॉन स्ट्राईक एन्डला होता. त्यामुळे ऑस्ट्रेलियाचा विजय लांबला. कॉनलीने स्ट्राईक मिळाल्यानंतर कांगारुंना जिंकून देण्याचा प्रयत्न केला. पण मुस्ताफिझूरने त्याची खेळी संपुष्टात आणली. कॉनलीने १३ चौकार आणि ६ षटकारांसह १३४ चेंडूत १४९ धावांची मॅरेथॉन खेळी साकारली. बांगलादेशतर्फे शोरिफुल इस्लामने ६ विकेट्स पटकावत ऑस्ट्रेलियाच्या डावाला खिंडार पाडलं. कॉनली बाद झाल्यानंतर ऑस्ट्रेलियाची धावगती मंदावली. ॲडम झंपाने शेवटच्या षटकात चौकार लगावत ऑस्ट्रेलियाच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं.कूपरचं वनडे कारकिर्दीतलं हे पहिलंवहिलं शतक आहे. ऑस्ट्रेलियाचं भविष्य म्हणून कूपरकडे पाहिलं जात आहे. काही दिवसांपूर्वीच आटोपलेल्या आयपीएल स्पर्धेत कूपरने शतकी खेळी साकारत नैपुण्याची चुणूक दाखवली होती. आशियाई उपखंडात चांगला खेळ करत कूपरने तिन्ही फॉरमॅटसाठी सज्ज असल्याचं दाखवून दिलं आहे.

# इम्रान यांना सहा महिन्यांपासून जेलमध्ये भेटू दिले जात नाही

बहीण आलीमा यांचा आरोप; विषप्रयोगाची भीतीही व्यक्त

लाहोर : पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्राान खान यांना गेल्या सहा महिन्यांपासून भेटू दिले जात नाही, असा आरोप त्यांची बहीण आलीमा यांनी केला आहे. प्रकृतीविषयी चिंता व्यक्त करण्याबरोबरच इम्रान यांच्यावर विषयप्रोग करण्यात आल्याची भीती व्यक्त केली आहे.

गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये इम्रान खान यांना त्यांच्या कुटुंबीयांना भेटण्याची परवानगी दिली होती. त्यानंतर एकदाही भेटू दिले नाही, असा आरोप आलीमा यांनी केला आहे. इम्रान ७३ वर्षांचे असून ऑगस्ट २०२३ पासून ते रावळपिंडी येथील आदिला तुरुंगात भ्रष्टाचारा प्रकरणी शिक्षा भोगत आहेत.



एप्रिल २०२२ मध्ये ते सत्तेवरुन पायउतार झाले होते. त्यांना प्रदीर्घकाळ एकांतवासात कोंडून ठेवले आहे. मावनतेच्या दृष्टिकोनातून कोणत्याही मुलभूत सुविधा त्यांना दिल्या जात नाहीत.

सहा महिन्यांपासून त्यांची आणि कुटुंबीयांची एकदाही भेट झालेली नाही. तसेच पक्ष आणि कार्यकर्ते यांना भेटण्यास मज्जाव तुरुंग प्रशासनाने केला आहे. हा सर्व प्रकार कायदेशीरदृष्ट्या चुकीचा असून न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन असल्याचा आरोपही आलीमा यांनी केला. दरम्यान, ९ मे २०२३ मध्ये देशात हिंसाचार उफाळून आला होता. या प्रकरणी इम्रान यांच्या बहिणी आलीमा, उझमा यांना अटक केली होती. त्यांना ९ जून रोजी हंगामी जामीन दहशतवाद प्रतिबंधक न्यायालयाने दिला होता.



# ट्रॉफीचे पाप काही जात नाही! वर्ल्ड चॅम्पियन ऑस्ट्रेलियाला ५ ओव्हरमध्ये हव्या होत्या ८ धावा, बांगलादेशने पाहा कसे रडवले

मुंबई–वर्षभराने वनडे वर्ल्ड कप खेळवला जाणार आहे. या वर्ल्डकपसाठी आतापासून सर्व टीम तयारीला लागल्या आहेत.सगळ्याच टीम आपआपल्या टीमची बांधनी करत आहेत. अशात वर्ल्ड चॅम्पियन ऑस्ट्रेलिया मात्र बांगलादेशसमोर हतबल झालेली दिसली. तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत बांगलादेशन दोन सामन्यात ऑस्ट्रेलियाचा लाजिरवाणा पराभव केला. यानंतर शेवटच्या वनडे सामन्यात ऑस्ट्रेलियाकडे आपली लाज वाचवायची संधी होती.त्यानुसार ऑस्ट्रेलियाने लाज वाचवली, पण ज्याप्रमाणे आज ते सामना जिंकेल, ते पाहता सगळ्यांना त्यांची किव येते आहे. दरम्यान ऑस्ट्रेलियाची ही अवस्था ट्रॉफीच्या पापामुळे झाली आहे.

खरं तर बांगलादेशने मागचे दोन सामने जिंकून वनडे मालिका खिशात घातली होती.आता आजचा सामना जिंकून बांगलादेशला ऑस्ट्रेलियावर क्लिन स्विप करायचा होता. आणि ऑस्ट्रेलियाला आपली लाज वाचवण्यासाठी आजचा सामना जिंकणे आवश्यक होते. या सामन्यात बांगलादेशने २७४ धावांचे लक्ष्य ठेवले होते.या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाने एक विकेटने सामना जिंकला.

बांगलादेशने दिलेल्या २७४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाची सुरूवात खराब झाली होती. कारण एकामागून एक विकेट पडत होते. जोश इंग्लीश २१,मॅट रेनशॉ शुन्यावर बाद झाला होता. त्याच्यापाठोपाठ ॲलेक्स कॅरी ८ वर बाद झाला होता. एकीकडे एका बाजूने विकेट पडत असताना कुपर कॉनोली दुसऱ्या बाजुने ऑस्ट्रेलियाचा डाव सावरून होता.

त्यानंतर मार्नस लाबूशेनने २९, कॅमरन ग्रीनने २७ आणि ऑलिवर पीकने २७ धावा करून ऑस्ट्रेलियाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला होता.पण कुपर कॉनोली मैदानात असल्याने ऑस्ट्रेलियाला विजयाच्या आशा होत्या. ऑस्ट्रेलियाच्या ६ विकेट गमावून २६६ धावा केल्या होत्या.आता ऑस्ट्रेलियाला पुढच्या ५ ओव्हरमध्ये म्हणजेच ३० बॉलमध्ये ८ धावा हव्या होत्या.यावेळी ४५ व्या ओव्हरला दोन विकेट पडल्या आणि फक्त १ धाव दिली गेली.त्यामुळे पुढे २४ बॉल ८ धावा हव्या होत्या. त्यानंतर पुढच्या ओव्हरला फक्त ३ धावा आल्या. ४८ वी ओव्हर बांगलादेशकडून मेडन टाकली गेली आणि एक विकेटही आली.त्यामुळे ऑस्ट्रेलियाची २७० वर ८ अशी अवस्था झाली होती. त्यानंतर १२ बॉलमध्ये ७ धावा हव्या होत्या.त्यावेळी ४९ व्या ओव्हरला २ धावा आल्या. त्यात कुपर कॉनोली १४९ धावा करून बाद झाला. आता शेवटच्या ओव्हरला म्हणजेच ६ बॉलमध्ये ५ धावा हव्या होत्या.यावेळी झम्पाने एक फोर आणि एक धाव काढून ऑस्ट्रेलियाने एक विकेटने सामना जिंकला होता. बांगलादेश सारख्या संघाने ऑस्ट्रेलियाला विजयासाठी अक्षरश रडकुंडीला आणले होते. जर बांगलादेश आणखी एक विकेट काढली असती तर ऑस्ट्रेलिया हा सामना हरली असती. पण हा सामना जिंकून ऑस्ट्रेलियाने आपली लाज वाचवली.खरं तर २०२३ च्या वनडे वर्ल्डकपमध्ये ऑस्ट्रेलियाने मिचेल मार्शच्या नेतृत्वात भारताचा ६ विकेट राखून पराभव करत कप जिंकला होता. या विजयानंतर सेलीब्रेशन करताना भान विसरून मिचेल मार्शने ट्रॉफीवर पाय ठेवून फोटो काढले होते.मिचेल मार्शच्या या कृतीवर जगभर टीका झाली होती. या घटनेनंतर ऑस्ट्रेलियाचे दिवस फिरलेले. ट्रॉफीवर पाय ठेवल्यानंतर ऑस्ट्रेलिया मोठ्या स्पर्धा हरली होती.

# लातूर जिल्ह्यात पाणीटंचाई निवारणासाठी १५१ विहिरींचे अधिग्रहण, तर जळकोट तालुक्यात ३ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू

**लातूर/प्रतिनिधी:** जिल्ह्यात निर्माण झालेल्या पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेता, जिल्हा परिषद प्रशासनाकडून विविध उपाययोजना वेगाने राबविल्या जात आहेत. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या अहवालानुसार जिल्ह्यात ३ टँकर आणि १५१ विहीर अधिग्रहणाद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

सद्यस्थितीत जिल्ह्यातील केवळ जळकोट तालुक्यामध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असून, तेथील ३ गावे आणि १ वाडी अशा एकूण ४ टँकरद्वारे पाणी पुरवठा होत आहे. यामध्ये १ खाजगी आणि २ शासकीय मिळून एकूण ३ टँकर मंजूर करण्यात आले आहे. या टँकर्सच्या माध्यमातून मंजूर केलेल्या ६ खेपांनुसार प्रत्यक्ष पाणीपुरवठा केला जात आहे.

जळकोट तालुक्यातील शिवाजी नगर तांडा व वाघमारी तांडा येथे १० एप्रिल २०२६ पासून आणि गव्हाण येथे २४ एप्रिल २०२६ पासून टँकर मंजूर करण्यात आले असून, वंजारवाडा येथे १ जून २०२६ पासून टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

जिल्ह्यात सध्या टँकरसाठी ३ आणि टँकरव्यतिरिक्त इतर पाणीपुरवठ्यासाठी १४८ अशा एकूण १५१ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. या अधिग्रहित विहिरींच्या माध्यमातून जिल्ह्यातील एकूण १२५ गावे व वाड्यांना पाणीपुरवठा केला जात आहे. यामध्ये अहमदपूर तालुक्यात सर्वाधिक ५२ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले असून, त्याखालोखाल औसा तालुक्यात ३५, जळकोट तालुक्यात १५, निलंगा तालुक्यात १३, उदगीर तालुक्यात ११, रेणापूर तालुक्यात ८, चाकूर तालुक्यात ५, शिरूर अनंतपाळ तालुक्यात ६, लातूर तालुक्यात व देवणी तालुक्यात प्रत्येकी ३ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे.

# २८ जून रोजी पल्स पोलिओ लसीकरण

**लातूर/प्रतिनिधी:** पाच वर्षांखालील बालकांसाठी २८ जून रोजी पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील २ लाख ३४ हजार २३१ बालकांना लस दिली जाणार आहे. स्थलांतरित कुटुंबातील बालकांसाठी ९४ फिरत्या पथकांची व्यवस्था केली आहे.

लातूर जिल्ह्यातील ० ते ५ वर्षे वयोगटांतील बालकांना लस देण्यासाठी १९३३ पोलिओ बुथ केले असून, ३९३३ कर्मचारी नियुक्त केले आहेत. बसस्थानक, रेल्वेस्थानक परिसरात ७२ ट्रान्झिट पथके सज्ज ठेवली आहेत. २८ जून रोजी बुथवर पल्स पोलिओ लसीकरण झाल्यानंतर १७४० पथकांद्वारे घरभेटी घेऊन लसीकरण केले जाणार आहे. ही मोहीम ३० जून ते ४ जुलै दरम्यान, घरभेटीद्वारे लसीकरण केले जाईल.

# रक्तदानाच्या माध्यमातून लातूर पोलिसांनी जपली माणुसकीची परंपरा; किल्लारी व गातेगाव येथे १६६ रक्तपिशव्यांचे संकलन

**लातूर/प्रतिनिधी:** समाजाच्या सुरक्षेसाठी खांद्यावर जबाबदारीची वर्दी असली, तरी त्या वर्दीआड धडधडणारे हृदय हे समाजाप्रती संवेदनशील असते, याचा प्रत्यय लातूर जिल्हा पोलीस दलाने पुन्हा एकदा आपल्या कृतीतून दिला आहे. गुन्हेगारी नियंत्रण, कायदा व सुव्यवस्था आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या पोलिसांनी यावेळी समाजसेवेचा वेगळा आदर्श घालून देत रक्तदानाच्या माध्यमातून अनेक अनोळखी जीवांना नवजीवन देण्याचा संकल्प साकारला.




पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली, लातूर पोलीस दल, इंडियन रेडक्रॉस सोसायटी संचलित डॉ. भालचंद्र ब्लड सेंटर, लातूर आणि रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १२ जून २०२६ रोजी किल्लारी व गातेगाव येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिक, युवक, सामाजिक कार्यकर्ते तसेच पोलीस अधिकारी आणि अंमलदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत समाजसेवेच्या कार्यात आपला सहभाग नोंदविला.

आजच्या धावपळीच्या युगात अनेक रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध न झाल्याने जीव गमवावा लागतो. अपघातग्रस्त, गंभीर आजारांवरील उपचार घेणारे रुग्ण, शस्त्रक्रियेसाठी दाखल असलेले नागरिक आणि प्रसूतीदरम्यान रक्ताची आवश्यकता असलेल्या महिलांसाठी रक्त हा जीवनाचा आधार ठरतो. या वास्तवाची जाणीव ठेवून शेकडो रक्तदाते या मोहिमेत सहभागी झाले आणि समाजासमोर एक प्रेरणादायी उदाहरण उभे केले.

या शिबिरात किल्लारी येथे ११५ आणि गातेगाव येथे ५१ अशा एकूण १६६ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले. प्रत्येक रक्तपिशवी ही एखाद्या गरजू व्यक्तीसाठी आशेचा किरण ठरणार असून या रक्तसाठ्यामुळे अनेकांचे प्राण वाचण्यास मदत होणार आहे. त्यामुळे हा उपक्रम केवळ रक्तदान शिबिर न राहता माणुसकीचा उत्सव ठरला.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते लातूर पोलीस व रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वन हेल्मेट – वन लाईफ या उपक्रमाचे. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास हेल्मेट भेट देण्यात आले. रक्तदानातून दुसऱ्याचे जीवन वाचविताना स्वतःच्या जीवनाचेही रक्षण करण्याचा संदेश या अभिनव उपक्रमातून देण्यात आला. समाजहित आणि रस्ते सुरक्षा या दोन महत्त्वाच्या विषयांची प्रभावी सांगड घालणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.

रक्तदान करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य होते. कारण त्यांनी दिलेले रक्त कोणाच्या तरी आयुष्यात नव्या आशेचा श्वास निर्माण करणार होते. समाजात संवेदनशीलता, परस्पर सहकार्य आणि सामाजिक जबाबदारीची भावना वाढविण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे या शिबिरातून अधोरेखित झाले.

लातूर जिल्हा पोलीस दल केवळ कायद्याचे रक्षक नसून समाजातील प्रत्येक घटकाच्या सुख-दुःखात सहभागी होणारा विश्वासू मित्र आहे, ही भावना या उपक्रमातून अधिक दृढ झाली आहे. नागरिक आणि पोलीस यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक मजबूत करण्याबरोबरच समाजात रक्तदानाबाबत सकारात्मक जनजागृती निर्माण करण्यात या शिबिराला मोठे यश मिळाले. १६६ रक्तपिशव्यांच्या रूपाने जमा झालेला हा अमूल्य रक्तसाठा अनेक गरजू रुग्णांसाठी जीवनदान ठरणार आहे.

# शॉपर्स स्टॉपकडून आपल्या वार्षिक एंड ऑफ सीजन सेलची घोषणा

**लातूर/प्रतिनिधी:** भारतातील अग्रगण्य प्रीमियम फॅशन, सौंदर्य आणि जीवनशैली गंतव्यर शॉपर्स स्टॉपने आपल्या बहुप्रतिक्षित सेलची घोषणा केली आहे, जो आता देशभरातील त्यांच्या स्टोगअर्समध्ये सुरू झाला आहे. प्रीमियम खरेदीच्या अनुभवासाठी ओळखले जाणारे शॉपर्स स्टॉप ग्राहकांना एकाच सोयीस्कर ठिकाणी कालातीत क्लासिक्ससह नवीन हंगामी कलेक्शन शोधण्यासाठी आमंत्रित करत आहे.

SHOPPERS STOP

या सेलमध्ये ५०० हून अधिक प्रीमियम ब्रँड्सचा समावेश आहे, ज्यामध्ये महिलांचे, पुरुषांचे व लहान मुलांचे कपडे, फूटवेअर, ॲक्सेसरीज, हँडबॅग्ज, सौंदर्य आणि प्रवासाच्या आवश्यक वस्तूंचा समावेश आहे. दैनंदिन पोशाख आणि ऑफिसच्या कपड्यांपासून ते सणासुदीचे पोशाख आणि आकर्षक शैलींपर्यंत, खरेदीदार विविध आवडी आणि बजेटला साजेसे असे अनेक पर्याय शोधू शकतात.

या सेलबाबत मत व्यक्त करत शॉपर्स स्टॉपचे कस्टमर केअर असोसिएट आणि चीफ मार्केटिंग ऑफिसर जितेन महेंद्र म्हणाले, आमचे ग्राहक सातत्याने प्रगत खरेदी अनुभवासोबत प्रीमियम फॅशनचा शोध घेत असतात. हा सेल भारतातील आणि आंतरराष्ट्रीय ब्रँड्सचे वैविध्यपूर्ण मिश्रण एकत्र आणण्याच्या आमच्या कटिबद्धतेला सादर करतो, ज्याला शॉपर्स स्टॉपची ओळख असलेल्या वैयक्तिकृत सेवेची जोड मिळाली आहे.

आमचे दर्जेदार शैली अधिक सुलभ बनवण्यावर आणि सर्व माध्यमांवर विनासायास व फायद्याचा अनुभव सुनिश्चित करण्यावर लक्ष केंद्रित आहे. या ईओएसएसच्याव माध्यमातून ग्राहकांना प्रमुख ब्रँड्सवर ५० टक्यांश् पर्यंत सूट मिळू शकते. या सेलमध्ये मायकेल कॉर्स, चेरुती १८८१, जुसी कुटूर, टॉमी हिलफिगर, केल्विन क्लेन, व्हेरो मोडा, डब्लू, जॅक अँड जोन्स, ॲडिडास आणि अल्डो यांसह इतर अनेक प्रमुख आंतरराष्ट्रीय आणि प्रीमियम ब्रँड्सचा समावेश आहे.

*नियम आणि अटी लागू. उच्च दर्जाचा खरेदी अनुभव देण्याच्या आपल्या कटिबद्धतेला दृढ करत शॉपर्स स्टॉप आपली सिग्नेचर पर्सनल शॉपर सेवा, स्टोेअरमधील तज्ज्ञ मदत आणि विनासायास ओम्नीचॅनल प्रवास सातत्याने प्रदान करत आहे. ग्राहक देशभरातील शॉपर्स स्टॉप स्टो अर्समध्ये किंवा www.shoppersstop.com या वेबसाइटवर ऑनलाइन या सेलचा लाभ घेऊ शकतात.

# मुरुड अप्पर तहसील निर्मितीला वेग

**मुरुड /प्रतिनिधी:** मुरुड येथे स्वतंत्र अप्पर तहसील कार्यालय स्थापन करण्याच्या हालचालींना वेग आला असून महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने यासंदर्भातील प्रक्रिया सुरू करत नागरिकांकडून येत्या पंधरा दिवसांत हरकती मागविल्या आहेत. शासनाच्या निर्देशानुसार प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालयाबाबत १५ दिवसांची जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात येणार असून या कालावधीत प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांची छाननी केली जाईल. त्यानंतर प्रशासनाचा सविस्तर अहवाल विभागीय आयुक्तांमार्फत शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. मुरुड परिसरातील नागरिकांना महसूल विभागाशी संबंधित विविध कामांसाठी दूरवर जावे लागते. नवीन अप्पर तहसील कार्यालय सुरू झाल्यास उत्पन्न दाखले, रहिवासी दाखले, जमीनविषयक प्रकरणे तसेच इतर महसूल सेवा स्थानिक स्तरावर उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचणार आहेत. अप्पर तहसील कार्यालयाच्या स्थापनेमुळे मुरुड परिसराच्या प्रशासकीय विकासाला चालना मिळणार असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. आता शासनाच्या अंतिम निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# निटूरात भरधाव टँकरने दुचाकीस्वाराला चिरडल



निटूर–जहिराबाद–लातूर महामार्गावरील निटूर ते निटूर मोड दरम्यान भरधाव टँकरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची भीषण घटना शुक्रवारी दि.१२ सायंकाळी साडेचारच्या सुमारास घडली. सुधाकर ज्ञानोबा चव्हाण (वय ३२, रा. निटूर, ता. निलंगा) असे मृत तरुणाचे नाव असून, महिनाभरातील ही दुसरी जीवघेणी दुर्घटना असल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सुधाकर चव्हाण हे दुचाकीवरून निटूर मोड येथून निटूरकडे येत होते. त्याचवेळी एक टँकर भरधाव वेगाने निटूरच्या दिशेने येत होता. मुख्य रस्त्यावरील पेट्रोल पंपाजवळील पुलाजवळ टँकरने दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की, सुधाकर चव्हाण हे ट्रकच्या चाकाखाली सापडले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान, जहिराबाद–लातूर महामार्गावर वाहनांचा वाढता वेग आणि गावाजवळही स्पीड ब्रेकर नसल्याने अपघातांचे प्रमाण वाढत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. महिनाभरापूर्वी याच निटूर येथे ट्रकच्या धडकेत नागनाथ पांडुरंग मदाळे यांचा मृत्यू झाला होता. सलग दुसऱ्या अपघातामुळे महामार्गावरील वाहतुकीवर नियंत्रण आणण्याची आणि सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# लातूरात म. ई. तंगावार लिखित 'विचारवतांचा मराठवाडा' ग्रंथाचे प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांच्या हस्ते प्रकाशन

**लातूर/प्रतिनिधी:** श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर येथील मराठी विभागात कार्यरत असलेले प्रा. डॉ. म. ई. तंगावार यांचा 'विचारवंताचा मराठवाडा' हा ग्रंथ सायन प्रकाशन, पुणे यांनी ०५ जून २०२६ रोजी प्रकाशित केला. या ग्रंथाचे विमोचन प्रसिद्ध विचारवंत, त्रैमासिक विचारशलाकाचे संपादक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांच्या हस्ते झाले. सदरील ग्रंथातील काही लेख नवभारत आणि वैभवशाली मराठवाडा यासारख्या महत्त्वाच्या नियतकालिकातून प्रकाशित झालेले आहेत.



प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांच्या निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमास युनिक फाउंडेशनचे कार्यकारी संचालक, लेखक आणि संशोधक प्रा. विवेक घोटाळे, मसापच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य डॉ. जयद्रथ जाधव, मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. कांत जाधव, राजर्षी शाहू महाविद्यालयाचे मराठी विभागाचे प्रमुख डॉ. संभाजी पाटील, वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर येथील मराठी विभागातील समीक्षक डॉ. रवींद्र बेंबरे, उदगीर येथील वाचक संवाद या चळवळीचे प्रमुख अनंत कदम, दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील प्रा. डॉ. राजू मोरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि लेखकाचा परिचय डॉ. संभाजी पाटील यांनी करून दिला. ग्रंथाचे महत्व आणि ग्रंथ निर्मितीमागची प्रेरणा डॉ. पाटील यांनी प्रास्ताविकात विस्ताराने विशद केली.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार म्हणाले, विचारवंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपली भूमिका ठामपणे घेत असतात. आज अभ्यासकांमध्ये मूलभूत चिंतन आणि व्यासंगाचा अभाव दिसत आहे, हे दुर्दैव म्हणावे लागेल. विदेशामध्ये सूक्ष्मपणे चिंतन करण्याची प्रवृत्ती आहे. त्यामुळे अनेक नोबेल त्यांना मिळालेले आहेत. वैचारिक साहित्यामुळे सर्वधर्मसमभावाची शिकवण मिळते. हे साहित्य प्रबोधनाचे काम करीत असते. म. ई. तंगावार यांचा 'विचारवंताचा मराठवाडा' हा ग्रंथ मराठवाड्यातील वैचारिक साहित्याचा महत्त्वाचा दस्ताऐवज आहे. मध्ययुगीन संत साहित्यातील वैचारिकता, स्वातंत्र्यपूर्व काळातील वैचारिक साहित्य आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठवाड्यातील विचारवंत यांचा चिकित्सक वेध या ग्रंथात तंगावार त्यांनी घेतला आहे. या ग्रंथातील अनेक विचारवंतांना फुले, शाहू, आंबेडकर यांच्या क्रांतिकारी तत्त्वज्ञानातून प्रेरणा मिळाली आहे.

प्रस्तुत ग्रंथातील सगळे विचारवंत मराठवाड्यातीलच नव्हे, तर महाराष्ट्रातील वैचारिक क्षेत्रातले मानदंड आहेत. तंगावार यांनी अचूक आणि वस्तुनिष्ठपणे मराठवाड्यातील विचारवंतांचा वेध घेतलेला आहे. यापुढे त्यांनी महाराष्ट्रातील वैचारिक साहित्यावर एखाद्या प्रकल्पाचे काम हाती घ्यावे, अशी अपेक्षा व्यक्त करीत प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी प्रसिद्ध विचारवंत स्व. जनार्दन वाघमारे यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. राजू मोरे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. रवींद्र बेंबरे यांनी मानले.

# विभागाने टिकेकरवाडी स्टेशन यार्डमधील पायाभूत सुविधांच्या आधुनिकीकरणाचे काम पूर्ण करून सुरक्षितता, क्षमता आणि परिचालन कार्यक्षमता वाढवली

**सोलापूर/प्रतिनिधी:** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने नुकत्याच पार पडलेल्या ट्रॅफिक ब्लॉक्सच्या माध्यमातून टिकेकरवाडी स्टेशनवरील यार्डच्या पायाभूत सुविधांच्या आधुनिकीकरणाचे काम यशस्वीरित्या पूर्ण केले आहे, ज्यामुळे पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण आणि क्षमता वाढीच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला गेला आहे. या आधुनिकीकरणामुळे स्टेशन यार्ड अधिक सुरक्षित, अधिक कार्यक्षम आणि भविष्यासाठी सज्ज अशा रेल्वे सुविधेत रूपांतरित झाले आहे, जे वाढत्या प्रवासी आणि मालवाहतुकीची मागणी हाताळण्यास सक्षम आहे.



प्रमुख सुधारणा आणि त्यांचे फायदे सुरक्षितता वाढवण्यासाठी सिग्नलिंग प्रणालीचे आधुनिकीकरण: स्टेशनवर जुन्या पॅनल इंटरलॉकिंग प्रणालीच्या जागी आधुनिक इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. हे प्रगत तंत्रज्ञान मानवी चुकांची शक्यता कमी करून आणि गाड्यांची सुरक्षित वाहतूक सुनिश्चित करून सुरक्षितता वाढवते.

क्षमता वाढवण्यासाठी मार्गांचा विस्तार: लांब प्रवासी आणि मालगाड्या सामावून घेण्यासाठी स्टेशनच्या कार्यरत मार्गांचा विस्तार करण्यात आला आहे. यामुळे मार्गाची क्षमता वाढेल, गर्दी कमी होईल आणि रेल्वे वाहतुकीच्या वाढत्या मागणीला आधार मिळेल.वेळेवर येण्याच्या दरात सुधारणा करण्यासाठी यार्डचे अनुकूलन: गाड्यांना जलदगतीने स्वीकारणे आणि पाठवणे शक्य व्हावे यासाठी यार्डच्या आराखड्याची पुनर्रचना आणि अनुकूलन करण्यात आले आहे. परिणामी, गाड्यांचा विलंब कमी होईल आणि वेळेवर येण्याच्या दरात सुधारणा अपेक्षित आहे.

कार्यक्षम रेल्वे संचालनासाठी सिग्नल पायाभूत सुविधांचे अद्ययावतीकरण: अतिरिक्त शंटिंग सिग्नल आणि अद्ययावत सिग्नलिंग पायाभूत सुविधा पुरवण्यात आल्या आहेत, ज्यामुळे स्टेशन यार्डमधील गाड्यांची हालचाल अधिक कार्यक्षमतेने व्यवस्थापित करता येईल.

उत्तम विश्वासार्हतेसाठी ट्रॅकच्या घटकांचे अद्ययावतीकरण: आधुनिक उच्च-क्षमतेचे स्विच आणि सुधारित ट्रॅक व्यवस्थेसह ट्रॅकचे महत्त्वाचे घटक अद्ययावत करण्यात आले आहेत. या सुधारणांमुळे रेल्वेचे संचालन अधिक सुरळीत होईल आणि कार्यान्वयनातील बिघाडाची शक्यता कमी होईल. यामुळे कार्यान्वयनातील विलंब कमी होण्यास आणि रेल्वे सेवांची विश्वासार्हता सुधारण्यास मदत होईल.

माल हाताळणी सुधारण्यासाठी सायडिंगचा विस्तार: बॅलस्ट आणि माल हाताळणीसाठी असलेल्या एका समर्पित सायडिंगचा विस्तार आणि बळकटीकरण करण्यात आले आहे, ज्यामुळे माल आणि रेल्वे साहित्याची जलद हालचाल आणि हाताळणी शक्य होईल. यामुळे मालवाहतुकीच्या कामकाजात सुधारणा होईल आणि प्रदेशातील औद्योगिक व व्यावसायिक उपक्रमांना पाठिंबा मिळेल.भविष्यासाठी सज्ज पायाभूत सुविधांकरिता स्थानकांचे आधुनिकीकरण: आधुनिक परिचालन मानकांची पूर्तता करण्यासाठी रुळांमधील अंतर आणि स्थानकांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे, ज्यामुळे सुरक्षितता वाढेल आणि भविष्यातील विस्तार व वाढत्या रेल्वे वाहतुकीसाठी क्षमता निर्माण होईल.

या कामांच्या अंमलबजावणीदरम्यान आधुनिक रेल्वे उपकरणे आणि यंत्रसामग्रीचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला. यामध्ये युनिमॅट (णछखच-ढ) ट्रॅक टॅम्पिंग मशीन्स, रेल क्रेन, हायड्रॉलिक ट्रॅक जॅक आणि स्ल्यूइंग उपकरणे, रेल कटिंग आणि ड्रिलिंग मशीन्स, ईआरसी (एठउ) क्लिप बसवणारी आणि काढणारी उपकरणे, टॉवर वॅगन्स, ओएचई (जकए) कामांसाठी क्रिम्पिंग टूल्स, तसेच पोर्टेबल जनरेटर्स आणि लाइटिंग टॉवर्स यांचा समावेश होता. 'ब्लॉक' कालावधीत वॉकी-टॉकी, क्रँक हँडल्स, क्लॅम्प्स आणि पॅडलॉक्सच्या वापरामुळे परिचालन सुरक्षा आणि समन्वय अधिक बळकट करण्यात आला.

हे श्रेणीसुधारणेचे काम सोलापूर विभागाच्या विविध विभागांच्या समन्वयाने पूर्ण करण्यात आले. या कामासाठी एकूण ३६८ हून अधिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती; यामध्ये परिचालन (जशिीरींळपस), अभियांत्रिकी (एपसळपशशीळपस), सिग्नलिंग आणि दूरसंचार (डळसपरश्रश्रळपस ढशश्रशलेााीपळलरींळेप), ट्रॅक्शन आणि वितरण व विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांचा समावेश होता. त्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे नियोजित 'ब्लॉक' कालावधीत हे श्रेणीसुधारणेचे काम यशस्वीरित्या पूर्ण झाले.

या कामांची यशस्वी पूर्तता आधुनिकीकरण, सुरक्षा वृद्धी आणि क्षमता वाढीसाठी सोलापूर विभागाची निरंतर कटिबद्धता दर्शवते, ज्यामुळे प्रवासी आणि मालवाहतूक ग्राहकांसाठी कार्यक्षम व विश्वसनीय रेल्वे सेवा सुनिश्चित होतात.




# सिंगल युज प्लास्टिकवर मनपाची कारवाई

## १० किलो प्लास्टिक जप्त; नऊ हजार दंड वसूल

**लातूर/प्रतिनिधी:** रविवार दि.१४ जुन रोजी महापौर जयश्रीताई सोनकांबळे, आयुक्त श्रीमती मानसी यांचे निर्देशानुसार गंजगोलाई भागात सिंगल युज प्लास्टीकवर कार्यवाही करण्यात आली.

सदर कार्यवाही दरम्यान ३ आस्थापनांवर दंडात्मक कार्यवाही करून १० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आला असून रू. नऊ हजार तीनशे रूपयेची दंडात्मक कार्यवाही करण्यात आली.तसेच सार्वजनीक ठिकाणी कचरा टाकणा-या दोन नागरिकांना दंड करण्यात आला.

सदर कार्यवाही दरम्यान प्रमुख स्वच्छता निरीक्षक अक्रम शेख, स्वच्छता निरीक्षक महादेव फिस्के,प्रदीप गायकवाड, रवि शेंडगे, श्रीकांत शिंदे,निलेश शिंदे तसेच कर्मचारी उपस्थित होते. ही मोहीम अशीच सुरू राहणार असून शहरातील व्यवसायीकांनी व नागरिकांनी प्लास्टिक कॅरीबग वापर टाळून कापडी बॅगचा वापर करावा व पर्यावरण संवर्धनास हातभार लावावा तसेच सार्वजनीक ठिकाणी कचरा टाकू नये असे आवाहन उपायुक्त वसुधा फड यांनी केले आहे.

# मांजरा धरणाला जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांची भेट

## मनपाच्या नवीन जॅकवेल कामाची पाहणी





**लातूर/प्रतिनिधी:** लातूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धनेगाव येथील मांजरा धरणाला जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी आज भेट दिली. यावेळी त्यांनी धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा घेतला असून, राज्य शासनाच्या आदेशानुसार धरणातील सर्व पाणी केवळ पिण्यासाठी राखीव ठेवण्याच्या सक्त सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

'एल निनो'च्या संभाव्य प्रभावाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व प्रकल्पांमधील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याचे निर्देश राज्य शासनाने निर्गमित केले आहेत. या अनुषंगाने पाटबंधारे विभागाने तातडीने कार्यवाही करावी, असे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड म्हणाले. तसेच, धरणातून अवैध पाणी उपसा करणाऱ्यांवर नियमानुसार तात्काळ कठोर कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

लातूर शहर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठ्यासाठी 'अमृत २.०' योजनेअंतर्गत मांजरा धरण परिसरात नवीन जॅकवेल उभारण्यात येत आहे. जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून कामाच्या प्रगतीची माहिती घेतली.

या पाहणी दौऱ्यावेळी जलसंपदा विभागाच्या अधीक्षक अभियंता रुपाली ठोंबरे, कार्यकारी अभियंता अमरसिंह पाटील आणि लातूर शहर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव यांच्यासह संबंधित विभागांचे इतर अधिकारी उपस्थित होते.

# शेतकरी कर्जमाफीतील अटी रद्द करण्याची निलंग्यातून मागणी;

## राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने निलंगा तहसीलदारांना निवेदन



**निलंगा/प्रतिनिधी:** राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचा २७ वा वर्धापन दिन निलंगा शहर कार्यालयात बुधवारी (दि. १० जून) उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने पक्षाच्या वतीने शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधत, 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजने'तील जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी देण्याची मागणी तहसीलदारांकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली.

शासनाने जाहीर केलेली ही योजना प्रत्यक्षात कर्जमाफी नसून कर्ज वसुलीची प्रक्रिया असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसने केला आहे. या योजनेतील जाचक अटींमुळे राज्यातील लाखो शेतकरी लाभापासून वंचित राहण्याची शक्यता असल्याने त्या तातडीने रद्द कराव्यात, अशी ठाम मागणी करण्यात आली. कार्यक्रमात पक्षाच्या स्थापनेपासूनच्या वाटचालीचा आढावा घेत संघटन मजबूत करण्याचा निर्धार करण्यात आला. यावेळी तालुकाध्यक्ष सुधीर मसलगे, शहराध्यक्ष इफरोज शेख, जिल्हा उपाध्यक्ष विनायक बगदुरे, अंगद जाधव, राजाभाऊ माने, सुरेश रोळे, हिराचंद जैन यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मागणी मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# शेतकऱ्यांना वेळेवर खते द्या; काँग्रेस जिल्हाध्यक्षांकडून विक्रेत्यांना निर्देश

**निलंगा/प्रतिनिधी:** खरीप हंगाम जवळ आल्याने शेतकरी मशागत आणि खत-बियाणे खरेदीत व्यस्त आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना वेळेवर व पुरेशा प्रमाणात खते मिळावीत आणि त्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये, असे आवाहन काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी निलंगा येथील खत विक्रेत्यांच्या बैठकीत केले. खरिपाच्या सुरुवातीला खतांची कृत्रिम टंचाई निर्माण करणे, जादा दराने विक्री करणे किंवा खतांसोबत इतर साहित्य घेण्याची सक्ती करणे, अशा प्रकारांना आळा बसला पाहिजे. शासनाने निश्चित केलेल्या दरानुसारच खतांची विक्री करून शेतकऱ्यांना पक्की पावती द्यावी, अशा कडक सूचना साळुंके यांनी दिल्या. तसेच, खत विक्रेत्यांना पुरवठा व वाहतुकीत प्रशासकीय अडचणी आल्यास काँग्रेस पक्ष पाठीशी खंबीरपणे उभा राहील.

**लिंकिंग थांबवण्याची गरज**

खरीप हंगामात खतांच्या मागणीत मोठी वाढ होते. याचा गैरफायदा घेत अनेकदा खतांची कृत्रिम टंचाई भासवली जाते किंवा विशिष्ट खतासोबत इतर कृषी साहित्य खरेदीची सक्ती (लिंकिंग) केली जाते. अशा तक्रारी येऊन देता, शासनाने ठरवून दिलेल्या दरातच आणि पक्क्या पावतीसह खतांची विक्री करावी. शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू असल्याने त्याला वेळेवर खते उपलब्ध करून देणे ही सर्वांची जबाबदारी आहे, असा महत्त्वपूर्ण मुद्दा या बैठकीत अधोरेखित करण्यात आला.




# लातूर जिल्हा इतिहास परिषदेच्यावतीने प्रा.डॉ.पारवे व प्रा.डॉ.लासुरे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी:** दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ.रमेश पारवे व भाई किशनराव देशमुख महाविद्यालय, चाकूर येथील इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ.भारत लासुरे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त लातूर जिल्हा इतिहास परिषदेच्यावतीने त्यांचा सन्मान चिन्ह, शाल व पुष्पहार देऊन लातूर येथे यथोचित सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.नरेंद्र देशमुख (इतिहास विभागप्रमुख, कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव) हे होते. तसेच जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातून आलेल्या इतिहास विषयाच्या प्राध्यापकांनी सुद्धा त्यांचा सत्कार केला. यावेळी सेवानिवृत्त प्रा.डॉ.अनिल सिंगारे, प्राचार्य डॉ.संजय वाघमारे, प्रा.डॉ.रमेश गंगथडे, प्रा.डॉ.अमोल शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सत्काराला उत्तर देताना प्रा.डॉ.रमेश पारवे व प्रा.डॉ.भारत लासुरे यांनी आपल्या सेवाकाळातील विविध आठवणी व अनुभवांना उजाळा देत मौलिक मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्रा.डॉ.नरेंद्र देशमुख यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.सदाशिव दंदे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.ओमशिवा लिगाडे यांनी मानले.

याप्रसंगी लातूर जिल्हा इतिहास परिषदेच्या समन्वय समितीतील सदस्य प्रा.डॉ.सुनील पुरी, प्रा.डॉ.शहाजहान शेख, प्रा.डॉ.सचिन हंचाटे, प्रा.डॉ.विजयकुमार मेकेवाड, प्रा.डॉ.सुरेश नांदे, प्रा.डॉ.शिवाजी गाढे, प्रा.डॉ.वसंत बंडे, सेवानिवृत्त प्रा.डॉ.अंगद पवार यांच्यासह जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील इतिहास विषयाचे प्राध्यापक, पारवे व लासुरे कुटुंबीय, स्नेही व मित्रपरिवार उपस्थित होते.


**टी .सी. हरवली आहे**

रितेशकुमार मनोजकुमार कोंडापुरे या नावाची इ.१२ (सायन्स) पास ची महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,लातूर ची टी.सी. निलंगा ते लातूर बस प्रवासात हरवली आहे.कोणास सापडल्यास संपर्क करावा योग्य बक्षीस देण्यात येईल.

संपर्क: रितेशकुमार मनोजकुमार कोंडापुरे
मोबाईल :९०९६३०८७७०


# महात्मा गांधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सत्कार

**अहमदपूर/प्रतिनिधी:** येथील विचार विकास मंडळसंचलित महात्मा गांधी महाविद्यालय येथील करिअर कट्टा व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या आणि पोलिस, सैन्य, अग्निवीर तसेच राज्य राखीव पोलिस दलातील विविध पदांवर निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कारकरण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष ॲड. किशनराव बेंडकुळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस उपअधीक्षक अरविंद रायबोले, पोलिस निरीक्षक असद शेख, प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार उपस्थित होते. यावेळी सोहेल शेख, गोविंद मगमुरे, रोहित गायकवाड, वैष्णवी सोनकांबळे, अजय बोरुडे, सचिन इंगळे, पांडुरंग हाके, राम बहिरे, शुभम रेचेवाड, नागनाथ कापसे, संतोष मुकनर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी असद शेख यांची पोलिस निरीक्षक पदावर पदोन्नती झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.


**निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र**

**सितारी विमा सेवा केंद्र**

दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.

वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत

जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA

एजंट भरती चालू आहे.

संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


## रक्त फॅक्टरी..

माणसाच्या शरिरी
केवळ रक्त फॅक्टरी
चोवीस तास सहज
कामअव्याहत करी
यंत्रणा सज्ज सारी
दूषित रक्त दूर करी
रक्त शुद्ध सळाळते
धमन्याधमन्या भरी
रक्त तयार करायला
प्रयासकेली परोपरी
जमले न माणसाला
किती प्रगत हो जरी
रक्त अति महत्वाचे
गरज ती खरो खरी
रक्तावीण जीव गेले
नाहक ते कितीतरी
रक्तदान नित्य करी
माणूसकी भर जरी
अन्यत्र ना दान असे
सेवा अनमोल खरी
रक्तदान करता जरी
नव रक्त जमे सत्वरी
दूर सरावी अंधश्रद्धा
अशक्तता नये शरिरी
सु कर्मकरी वरचेवरी
पुण्य कर्म घ्या पदरी
माणसा माणसातली
दूर हळुहळू होई दरी

**-हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# शिवसेना जिल्हा सहसंपर्क प्रमुख सी.के.मुरळीकर यांच्या अमृतमहोत्सवी दिनानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

**लातूर/प्रतिनिधी:** सामाजिक,धार्मिक,शैक्षणिक,सांस्कृतिक,व्यापार,बँकींग क्षेत्रातील आदर्श व्यक्तीमत्व लातूर जिल्हा शिवसेना सहसंपर्क प्रमुख सी.के.उर्फ चंद्रनाथ मुरळीकर यांचा अमृतमहोत्सवी (दि.१२ जून )दिनानिमित्त विविध क्षेत्रातील हजारो स्नेहीजनांनी हॉटेल तुलसी येथे आयोजित सदिच्छा समारंभात उपस्थित राहून तसेच अनेकांनी मोबाईलवरुन त्यांचे अभिष्टचिंतन केले.

शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख माजी आ.रोहिदास चव्हाण यांनी शुभेच्छा देताना मुरळीकर हे बोले तैसा चाले,त्याची वंदावी पाऊले या उक्तीप्रमाणे जगणारा माणूस अशा शब्दात गौरव करुन शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी आ. दिनकर माने,प्राचार्य डॉ.आर.डी.निटूरकर,यांनी यावेळी सी.के.मुरळीकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकत त्यांच्यासारख्या जनमनात राहणारे व्यक्तीमत्व कार्यकर्त्यांसमोर आदर्श असलयाचे सांगून अभिष्टचिंतन केले.




सत्काराला उत्तर देताना सी.के.मुरळीकर यांनी आजपर्यंतच्या वाटचालीचा आढावा देत शिवसेनेच्या २० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारण,आणि हाताला काम देणारे हिंदूत्व देणार्या धोरणामुळे आपण अनेक वर्षांपासून शिवसेनेत काम करतोय,पण एकदाही मातोश्रीचा दरवाजा पाहिला नाही,कारण आपल्यावर सोपविलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणे हीच पक्षनिष्ठा असल्याचे स्पष्ट केले. आपल्या आयुष्यातली ७५ वर्षे संपली पण आपल्या प्रचंड सदिच्छेमुळे आणखी समाजकार्य करण्यासाठीची उर्जा मिळाली असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष रवी कुरील यांनी केले.सूत्रसंचालन डॉ.नरसिंग वाघमोडे यांनी केले.इंजि.चेतन मुरळीकर यांनी आभार मानले.

याप्रसंगी शेषराव हालगरकर, माधवराव गायकवाड, समींदर वाघमारे, नवनाथ गायकवाड,चंद्रकांत सूर्यवंशी, डी.एन.शिंदे, अनिरुध्द शिंदे, शिवसेना नेते आर.एस.चव्हाण, माजी तहसीलदार मधुकर श्रंगारे, विकास मुळे, सुरज लोखंडे, सोपानराव नाबदे, डॉ.प्रवीण कांबळे, प्राचार्य कमलाकर कांबळे, राज आरनाळकर, शिवाजी दामावले, ॲड.पंडीत जाधव, ॲड.शिवकुमार जाधव, गोपाळ तावशीकर, प्रा.लामतूरे, शहाजी वळगावकर, बालजी साबळे, विभीषण सांगवीकर, भागवत दळवी, ओमकार दळवी, त्रिंबक स्वामी, बालाजी शेरखाने,हणमंत पडवळकर,शिवसेना नेते पप्पू कुलकर्णी, शिवसेना नेते संतोष सोमवंशी, अनिल कबाडे,वामन शेवाळकर,रमेश बिरादार, प्रशांत कोरे, प्रा.ओमप्रकाश झुरळे, सदानंद पवार, ॲड.राहूल मातोळकर,रोहिदास वाघमारे, सभापती सुनीता वाघमारे, डॉ. संतोष वाघमारे, लखनगावे,राष्ट्र सेवा दलाचे पांडुरंग देडे, बी.एस.पाटील,उजळंबे, पत्रकार राम जेवरे,श्रीराम संपते,बाळ होळीकर,लिंबराज पन्हाळकर,शिरीशकुमार शेरखाने,गुळवे सर,गणेश सावळकर,वैशाली कांबळे, शिवसेना उबाठा,शिंदे शिवसेना,काँग्रेस,भाजपा,वंचित बहुजन आघाडी,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी या पक्षांसह विविध सामाजिक संस्था,संघटनांच्या पदाधिकारी,कार्यकर्ते,मित्र,स्नेही,आप्तेष्टांनी सी.के.मुरळीकर यांचा पत्नी शकुंतलासह फेटा,शाल,भरपेहराव आहेर,बुके,पुष्पहार,भेटवस्तू,ग्रंथ,सन्मानचिन्ह देवून सी.के.मुरळीकर यांना वाढदिवसांच्या शुभेच्छाचा वर्षाव केला.


**लातूर समाचार www. latursamachar. com वर रोज वाचा ऑनलाईन....**



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**साहित्याचा पुरवठा**

विभागीय भांडार कार्यालय मध्य रेल्वे सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी सक्षम आणि प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्युरमेंट संकेतस्थळावर www. ireps.gov.in ऑनलाइन ई-निविदा मागविण्यात येत आहेत: **निविदा क्रमांक: 96255853B. तपशील:** 'लाइट वेट लिथियम बॅटरी टॅम्पिंग मशीन'च्या एका संचाचा ज्यात २ टॅम्पर्सचा समावेश असेल पुरवठा, बसणी आणि कार्यान्वित करणे. (यात ८ बॅटरी, ४ चार्जर, ०४ टॅम्पिंग टूल्स आणि ०२ ट्रान्सपोर्टेशन ट्रॉली यांचा समावेश आहे; **तपशील** 'परिशिष्ट-अ' मध्ये दिल्याप्रमाणे). संख्या: १५ संच. **अनामत रक्कम: ₹** ४,६८,१३०.००. www.ireps.gov.in वर **निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:** ०२.०७.२०२६ रोजी ११.३० नंतर. इच्छुक निविदाकारांना सल्ला दिला जातो की, निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेबाबत जारी केलेले कोणतेही बदल किंवा शुद्धिपत्रके पाहण्यासाठी त्यांनी संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी. संकेतस्थळ: www.ireps.gov.in

वरिष्ठ विभागीय सामग्री व्यवस्थापक, सोलापूर
EXP-29

तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा


**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : BAGVAN AMIR CHANDSAB TO AMIR CHANDSAB BAGWAN.
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the AMIR CHANDSAB BAGWAN will used by my family husband /wife, children and relative.
**OLD NAME** :- BAGVAN AMIR CHANDSAB.
**NEW NAME:**- AMIR CHANDSAB BAGWAN.
**Address** :- AZAD NAGAR, NEAR DATTA MANDIR, AT POST NALEGAON. TQ.CHAKUR, DIST. LATUR -413524
**AADHAR NO.**- 290603159473
**Mob. No.**- 8554855227

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade    Mo. 9422472502,    RNI 47034/64,    POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे.    मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२    आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६